
# श्री साईलीला



पाण्याचे दिवे पेटविण्याचा चमत्कार

मार्च ६० पैसे १९७४

# श्रीसाईलीला मार्च १९७४

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | संत व पूर्ण मुक्ति |
| २. | माहेर | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ३. | गुळवणी महाराज | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ४. | श्रीसाईनाथ ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ५. | विद्यापती | श्री. विनायक पाठक |
| ६. | कविता:— श्री. मधुकर जोशी, सौ. सुशीलाबाई हजारे, श्री. अरुण शहाणे, श्री. दिवाकर घैसास, श्री. चिपळूणकर गुरुजी, श्री. महादेव साने, श्री. चेतन, श्री. स. कृ. काळे. | |
| ७. | श्री. दादाजी धुनीवाले | श्री. श्री. ना. हुद्दार |
| ८. | त्यजूनि वस्त्रें नर जेंवि जीर्ण | श्री. वि. के. छत्रे |
| ९. | श्रीसाईउदीचा चमत्कार | श्री. पी. एस. भुजबळ |
| १०. | श्रीगोंदवलेकर महाराज | श्री. पु. मु. अत्रे |
| ११. | अनंतता | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| १२. | शिरडी वृत्त | |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वाक्सुधा

प्रेमचि नाहीं ज्याचे ठायीं । ऐसा मानव होणेंचि नाहीं ।
कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं । अधिष्ठान पाहीं आनान ॥१२६॥
कोणाचे प्रेमाची जागा संतती । कोणाची ती धन - मान संपत्ति ।
देह गेह लौकिक कीर्ति । विद्याप्राप्ति कोणाची ॥१२७॥
प्रेमे जें विषयीं वाटतें । तें सर्व जैं एकवटतें ।
हरिचरणमुशींत जें आटतें । तें तें प्रकटते भक्तिरूपें ॥१२८॥
म्हणवूनि गेह प्रपंचाला सोपा । चित्त साईचरणीं समर्पा ।
मग तयाची होईल कृपा । उपाय सोपा हा एक ॥१२९॥
ऐसियाही अल्प साधनीं । महल्लाभ हो घडतो जनीं ।
तरी या श्रेयसंपादनीं । औदासीन्य कैसें पां ॥१३०॥

साईसत्चरित्र - अध्याय १० वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] मार्च १९७४ [ अंक ११

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए., पीएच. डी., रा. भा. प्रवीण
- सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी, एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

# संत व पूर्ण मुक्ति

## संपादकीय

आपण सर्वजण आपल्या मनातील कल्पनांच्या अनुसार आचरण करीत असतो. आपल्या बद्दल आपल्या काही कल्पना असतात, आणि दुसऱ्याबद्दलहि काही कल्पना असतात. या कल्पनांची बांधणी पूर्वीच्या अनुभवांच्या स्मृतीवर होत असते. स्मृतींच्या साचत आलेल्या कणाकणांचे एक भिंग बनवूनच त्यातून आपण दुसऱ्या व्यक्तीकडे पहात असतो, आणि त्या कल्पनांमुळे आपण राग, प्रेम, तिरस्कार, आदर वगैरे भावनांची उभारणी करीत असतो. आपले जग हे स्मृति, कल्पना, मानसचित्रे, भावना, यांचे बनलेले असते. हे सर्व बाजूला ठेवून आपण जगाकडे पाहण्याचा प्रयत्नही करीत नाही; कारण कल्पनांच्या साम्राज्यात जी सुरक्षितता आपणाला मिळालेली असते ती आपण सोडू इच्छीत नाही. पण प्रत्यक्ष विश्वाची रचना कशी आहे हे मोकळ्या मनाने, पूर्वग्रहदूषित न झालेल्या मनाने, पहाण्याचे सामर्थ्य असल्याशिवाय मुक्ति ही शक्यच नाही. जोपर्यंत आपण कल्पनेशी जखडलेले असतो तो पर्यंत विश्वाच्या सर्वांगीण एकरूपतेचा स्पर्श आपणाला होऊ शकणार नाही. नेहमीच्या व्यवहारातील सर्व संबंध हे सुरक्षितता, विकासाची संधि, लाभ, हानि इत्यादि नानाविध विचारांच्या तणाव्यांनी बांधलेले असतात. जबाबदारी कर्तव्ये, आकांक्षा, इत्यादि अनेक गोंडस नावाखाली आपल्या मनात स्वार्थच वावरत असतो. हे वास्तवतेने पहाणे फार कठीण असते. कारण सत्य हे असुरक्षित अनाकलनीय आणि प्रचंड गतीने प्रेरित झालेले असते. त्यामुळे प्रियत्वाचा, आवडी-निवडीचा, सांभाळून ठेवण्याच्या प्रवृत्तीचा त्याला स्पर्शच होत नसतो. आणि हे बंधन स्वरूप कल्पनांचे धागे व तणावे निःसंगतेच्या स्वच्छ प्रकाशातच दिसू शकतात. पण ... ज्याला खऱ्या मुक्तीची तळमळ असते त्यालाच त्या गतिमान नित्य-सत्याशी एकजीव होता येते, निःसंगतेतच आपण आपल्या जगात परिपूर्ण क्रांति करू शकतो. पूर्णपणातच पूर्ण क्रांति भरलेली असते. त्यातच देवत्व असते, मानवतेचा परिधि असतो आणि सर्व 'स्व' समजून घेता घेता त्या पूर्ण आत्मक्रांतीचा उदय होत असतो. हे आत्मदर्शन, ही निःसंगता, ही क्रांति, हा पूर्णपणा, ही गति-मानता व ही मनाची मोकळी अवस्था समजून घेण्यासाठी मन अत्यंत नम्र हळुवार, तरल, स्पष्ट, वस्तुनिष्ठ, कल्पना विरहित व टवटवीत असायला पाहिजे. ज्यांच्या जवळ असे मन आहे त्यांचेच हे सारे जग, सारे विश्व 'आप्त' असते, तेथेच अमर्याद प्रीतीचा सागर असतो व असीम आनंदाचा निधी असतो. सर्व क्षणभंगुर वस्तूंत जर काही अक्षय असेल तर पूर्णताच होय, मुक्तीच होय. असे पूर्णत्व म्हणजे 'असणे' मात्र होय. जे असे अस्तित्वरूप झालेले असतात त्यांनाच 'सन्त' म्हणावे. ते वर्तमानकाळी बहुवचनी "सन्तः" या रूपात असतात, बाकी सर्व 'भूते' असून हे मात्र 'सन्ति' म्हणून "सन्तः" असतात. या निरपेक्ष, अनासक्त मुक्त मनाच्या बैठकीवरून कर्मरत असणारे संत हेच मुक्तीचे चालते बोलते पुतळे होत. !

# "माहेर"

—डॉ. के. भ. गव्हाणकर

मी जाते माहेराला। मूळ घराला ॥ धृ॥
आपण दोघे जाऊ माहेरी। ऐसे भासे माझ्या अंतरीं।
पुन्हा नाही येणें संसारी। त्याग मी केला ॥ १ ॥ (मुक्ताबाई)

खरोखर 'माहेर' हा शब्दच इतका गोड, मधुर आहे कीं, सर्व दु:खांचा, आपत्तींचा शेवट होऊन आपणास ब्रह्मानंदात, सुखसागरात घेऊन जातो. असे कोणते शून्य हृदय आहे की त्याला माहेरची, आपल्या मूळ घराची आठवण झाली असता आनंदाच्या उर्मी उचंबळून येत नाहीत — स्वत:चा क्षणभर कां होईना विसर पडून अनंत तरल भाव उदय पावत नाहीत. माहेरी सजीव निर्जीव इतकेच नव्हेतर अणूरेणूस जणूकाय वाचा फुटून त्या आपणांशी हितगुज करतात. तेथील प्रत्येक वायूची लहर आपणास निमिषार्धात चिमुकले बाह्यत्व देऊन हल्लख गीत गाते.

जन्मदात्या मातेच्या घरी— माहेरी वाढलो, पोसलो गेलो पण मूळ घराची— माहेराची ओळख — हो तिलाच जर माहीत नाही तर ती मला काय सांगणार वा दाखवणार ?

माझे माहेर शिरडी ! तेथे माझ्यासाठी ब्रह्मांडाची प्रीती साठवलेली आहे. येथेच मूळ घराची ओळख झाली. या जागेतच माझी खरी पहिली दृष्टी उघडली— या जागेतच पहिला अस्फुट उन्मादकारी ध्वनी निनादला, चैतन्याची कलिकाच उमलली, कोणते सुख ! कोणती परम आनंदाची मंगल वेळा, माउलीचा केवढा दररोज मंगोलोत्सव, संतसज्जनांच्या पंगतीस बसण्याचे मोठे भाग्यच, ही जेवणे काही साधी गोष्ट नव्हे, त्यांच्या थट्टेचा रंग, त्यांच्या डोळ्यातील तेज, त्यांचे हास्य पहात पहात त्यांच्या बरोबर आपल्या क्षुधेची तृप्ती करणे ही काही साधी गोष्ट नव्हे, पण माउलीस त्याची गंधवार्ता नाही. मिष्टान्नाची ताटे ! आले किती गेले किती गणती नाही, सदा ब्रह्मानंदात निमग्न; काय सांगू ! तिच्या हृदयास एकच ध्यास, तिच्या अंतकरणास एकच बंध—बाळाची दृष्टी मूळ घराकडे केव्हा वेधेल ! अंतरीची मूर्ती (हृदयस्थ) श्रीसाई सगुण रूपाने केव्हा पहातील ! या बद्दल तिची कोण उत्कंठा! जीवास कोण झुरणी ! "अरे तात्या ! (तात्या कोते पाटील) जो श्रीसाईबाबा' शिरडीतच आहे असे समजतो, त्याला 'श्रीसाई' कळलाच नाहीं बरं !"

पण येथे येण्यापूर्वी मी कोठे होतो ? मातेच्या उदरात ? त्याच्या अगोदर ! विश्वात, अदृश्य रूपाने तरंगतच होतो व तेथून वासनेच्या योगे पावसाच्या पाण्या-बरोबर, अन्नातून योग्य पुरुषाच्या रेतात व तेथून मातेच्या उदरात. त्या मातृकुहर-

रूपी मंदिरात मी कसा वाढलो? एक रक्तमांसाचा गोळा, पण प्रियतेच्या उबीने त्यास डोळे नाक कान फुटले. वैद्यशास्त्र एका जलबिंदूची क्रमाक्रमाने वाढ झाली त्याचे सविस्तर वर्णन करू शकेल. पहिल्या मासी अमूक अवस्था, दुसऱ्या मासी अमूक; परंतु ज्या प्रियतेत पहिला मास संपून दुसरा उगवला त्या प्रियतेच्या उबीचे कोण वर्णन करू शकेल? त्या मातृकुहरातसुध्दा माउलीच्या प्रीतीच्या आश्रयानेच वाढलो आणि जीवन प्रेमाने जगून सुखरूपपणे उदरातून नऊ महिन्यानी बाहेर आलो. जन्मापूर्वीची ही भूमि, किती गोड असेल! जन्मल्यावर माझ्या तोंडाने मी प्यालो माझ्या नाकाने श्वास घेतला पण या भूमीत आईच्या मुखातील रसाने माझी तृप्ती, आईच्या श्वासाने माझा प्राण, आईच्या जेवणाने माझे पोषण जणू दोघांचा जीव एकच, बाह्य अंगाने पाहिले तर रुधिरामध्ये पण वास्तविक प्रियतेच्या जलातच-श्रीसाईच्या प्रेमसागरातच हेलकावत होतो. मग ज्या जागेत जन्मलो ती जन्मभूमि-माहेर गोड, त्यापूर्वी जेथे होतो ती अति गोड व आता जेथे दृष्टी खोलली गेली-मूळ घराची ओळख झाली ती अतीव गोड. एकाहून एक गोड एवढे खरे.

मातेच्या उदरी कुहरी जलबिंदूपासून वाढलो पित्याच्या हृदयातील जी स्व-प्रीती त्याचाच सगुण जलबिंदु. स्वप्रीतीस्तव सारे जग गोड वाटते. स्वप्रीतीच सर्व क्रियांचे मूळ, हेच मूळ घर. स्वप्रीतीचे रूप आपण नीट लक्षात घेत नाहीं. स्व-प्रीती हा प्रत्येक जीवाचे ठिकाणी स्वयंभू कल्लोळ आहे. हा कल्लोळ तरी कोठून येतो? स्वतःची स्वतःस असलेली प्रीति काढून टाकता येणार नाहीं— येणारी नव्हे व कोठून उसनी आणलेली नव्हे ही स्वयंभू सत्तेची स्फूर्ति होय. अर्थात, ही स्वयंभू सत्ता म्हणजेच प्रभू श्रीसाई, प्रेमसत्ता होय. अर्थात एकाहून एक गोड स्थाने. जन्मलो ती जागा, तत्पूर्वीचे मातेचे उदरकुहर तत्पूर्वीचे पित्याचे हृदय आणि सर्वांना आधारभूत प्रभूप्रेमसत्ता.

प्रभूप्रियतेची स्फूर्तीच जीवाची जननी होय, तिच्या स्नेहानेच रजाचा गज होतो. ती त्यास कधीही विसंबणारी नव्हे. ती सतत डोळे भरून प्रिय दृष्टीने अमृत-धारांचा वर्षाव करणारी आहे. मातापित्यांचे प्रेम जसे प्रत्यक्ष तसे प्रभुत्वही आहे. मात्र त्याची प्रत्यक्षता आपणास वाटत नाही. ही प्रत्यक्षता वाटणे हाच सुखाचा मूलमंत्र होय. मातापिता मुलांना सोडून जातात. ते बाळ कितीही प्रिय असो— मातापित्याचा जीव की प्राण असो, त्याची कितीही उत्कट इच्छा असो परंतु ते आपल्या लाडक्या जवळ अखंड राहू शकत नाहीत. वेळ आली की त्यांना पुत्रास सोडून जाणे भाग पडते. ते प्रियत्व खरे पण सत्ताविरहित प्रियत्व. प्रभु साईचे प्रियत्व तसे नाही, ती प्रियसत्ता आहे. ती जीवास कधीच सोडून जात नाही. जीव म्हणजे प्रभूचाच जीव होय.

वास्तविक या प्रेमसत्तेतूनच जीव प्रसवला. आईस वाटते हा माझा मुलगा. हा माझेपणा म्हणजे प्रभूचाच अनुग्रह; प्रभूचाच पण प्रभू म्हणतो 'हा माझा नसून हा

तुझाच आहे.' हा ईश्वरी अनुग्रह मातेस होतो व तिचे ठिकाणी आपलेपणा उदय पावून बाळाचे रक्षण करतो.

प्रभू प्रेमाचा सागर आहे. जीव हा त्या प्रिय स्फूर्तीचा कारंजा होय; प्रभूच्या हृदयातील गोडीचे रूपच होय. प्रभू हा जीवाचा जिव्हाळा होय. 'जीवाचीया जीवा। प्रेमाचिया भावा।। प्रभू सगुण रूपाने जीवा करिता अवतार धारण करतो, ज्या स्थळी तो अवतार घेतो–शिरडी, पंढरपूर वगैरे, ती जीवाची माहेरघरेच, ही स्थळें मूळ माहेराची आठवण देतात. हृदयस्थाची आत्म्याची. संतांचे जीवन म्हणजे जन्मभर या स्थानांची सेवा होय. सेवा म्हणजे रससेवन एरव्ही बाह्य कर्मांचा विचार म्हणजे सेवा नव्हे. ती अंतरीच्या सेवनांनी सहज होणारी बाह्य क्रिया आहे. या स्थानांचा प्रेमपान्हा अखंड असून सर्वांना सारखा पुरणारा आहे. आपले तोंड मिटलेले असते म्हणून त्याचा रस आपणास चाखता येत नाही. हृदयातील आठव म्हणजे मुख उघडणे होय. आठव हाच सेवनाचा मार्ग होय. आठवचि पुरे। सुख आघवे मोहरे। आठवानेंच सर्व सुखे मोहरून येतात.

प्रभूची प्रीती हीच सर्वांची जननी आहे. ह्या प्रीतीची पाखर सर्वांवरच आहे, ही दृष्टी उकलली की प्रभु प्रीतीच्या दर्शनाचा आनंद अनुभविता येईल. हाच "सर्वांभूती भगवत् भार" होय. एरव्ही 'सर्व भूतीं भगवंत' या गप्पा होतील, किंवा कल्पना तरी करावी लागेल. नुसती कल्पना अगर आरोपित केलेली भावना कितपत टिकणार? कल्पना चढेल तशी पडेलही, पण प्रत्यक्ष दर्शनात कल्पना करावी लागणार नाहीं. स्वतःचे स्वतःवर प्रेम आहेच ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती आहे. शिवाय जगात आपण म्हणतो की माझे अमक्यावर प्रेम आहे पण ती गोष्ट खोटी. एक प्रभूच प्रेम करू शकतो. त्याची खूण प्रत्येकास स्वतःविषयी बरे वाटते ही होय. म्हणून प्रत्येकाचे ठिकाणची स्वयंभू स्वप्रीती म्हणजेच प्रभुदर्शन – मूळ माहेरा स्वप्रीतीवर नजर गेली की जगतातील प्रत्येक वस्तूकडे पहाण्याची दृष्टीसुध्दा पालटेल; मग इंद्रिये ही इंद्रिये नसून स्वशरीर ज्या प्रियतेतून उदय पावले त्याची स्फूर्तीच होत असे म्हटल्यावर इंद्रियदृष्टी मावळली, आईने दिलेल्या वस्तूकडे मूल वस्तुरूपाने न पहाता त्याच्या आठवात आईच असते. त्याप्रमाणे इंद्रियाच्या विषयात प्रभूप्रीतीच दिसेल, एक प्रियताच उदय पावेल.

पण हे उमगणार कसे? कळणे सोपे पण वळणे कठीण! ला उपाय काय? नुसती समजूत तयार होईल, व वेळ आली की पूर्वसंस्काराप्रमाणे आचरण घडेल. संस्कार व समजूत यामध्ये तर फारकत आहे व ती आपण नेहमीच पहातो.

अहो! वस्तूस्थिति काय आहे ती कळली तर पाहिजे. कळलेच नाही तर पुढील मार्गच संपला. तेव्हा कळणे ही सुध्दा कमी महत्वाची गोष्ट नव्हे. दुसरी गोष्ट अशी की कळणे हा जीवाचा धर्म असून वळणे ही प्रभूसत्ता आहे. ज्याने कळवून दिले तोच वळवील हा विश्वास ठेवून त्याचीच प्रार्थना करावी हाच याला उपाय. 'प्रेम देवाचे हे

देणें' या न्यायाने समजूत व संस्कार एक होतील. बाळाने हाक मारल्यावर आई धावणार नाही कसे असे होईल? देवा तूच मला कळविलेस तूच वळव. कळले नव्हते तोपर्यंत बरे होते. पण कळल्यावर उलट जीवास कासाविशी होते. कारण कळण्याची ओढ एकीकडे व मनाच्या पूर्वसंस्काराची ओढ एकीकडे. देवा! अशा स्थितीत मला काहीच कळत नाही. तूच यातून सोडव म्हणून अनन्यतेने करुणा भाकताच तो प्रभू अंतर देणार नाही, कारण तो सकळ जीवांचा मायबाप आहे.

ज्याप्रमाणे माहेरी आलेली सासुरवाशीण आपल्या मातेकडे प्रेमाच्या गोष्टी बोलते, हृदय मोकळे करते त्याप्रमाणे जीवाची, मूळ माहेर घरच्या माऊलीकडे प्रेमभावाने गुजगोष्टी करण्यात ब्रह्मानंद मिळतो म्हणून मुक्ताबाई म्हणते,

"मी जाते माहेराला। मूळ घराला॥

तात्पर्य – सजीव व निर्जीव श्रेणीमध्ये सतत एका नियत दिशेने प्रवास सुरू आहे. या शोधाची व प्रवासाची दिशा जाणण्यासाठीच अध्यात्माचा अंगिकार करावा लागतो. ज्याक्षणी तुम्ही मनःपूर्वक आतला शोध घ्यावयाचे ठरविता तेव्हा एक प्रतिसाद निर्माण होतो तो अतिशय महत्वाचा आहे हे लक्षात घ्या. कारण त्या प्रतिसादाबरोबरच प्रकाश पाझरत येतो, आणि जीवाच्या बालकाला दिव्यतेत उचलतो.

आत्म्याचा खराखरा आवाज जेव्हा येतो तेव्हा तुमच्या नसनसांमध्ये सखोल आनंदाचे भान जागृत होते. नसाना अं.ण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. आतून प्रगट होणाऱ्या आवाजाबरोबरच सांत्वनही येत असते आणि आत्म्याकडे जाण्याच्या प्रवासाचा शीण त्या सांत्वनाच्या वर्षावामुळे दूर होतो. आम्ही आवाज ऐकतो तेव्हा त्याबरोबर मदतही पाठविलेली असते व जडतेचे पडदे काही क्षण कां होईना दूर केले जातात व जीव ज्योतीचे दर्शन घडते. हा पडदा उघडतो. आत्म्याच्या आवाजाचे सार्वभौमत्वही त्याच्याकडे येते.

देह म्हणजे कर्मभोग, भोग जोपर्यंत चालू तोपर्यंत दरवाजा बंद. तो संपला कीं देवतेचे दर्शन. म्हणून त्याच्या दारातच – मूळ माहेर घरीच क्षणभर उभे रहा.

संसाराला प्रपंचाला गांजल्यावरच – माहेरची आठवण येते हे खरे – म्हणून-भजन, भक्ति करा – 'प्रेमसुखाच्या गोडीने त्या सुखात विरण्याची अवस्था ती भक्ति होय.

* * *

# प. पू. ‘ योगिराज गुळवणी महाराज ’

ले. सदानंद चेंदवणकर



मंगळवार ता. १५ जानेवारी १९७४ रोजी दुपारी दोन वाजता आकाशवाणीने एक दुःखद बातमी सांगितली ती अशी — योगीराज गुळवणी महाराज पुणे येथील वासुदेव निवासात दुपारी १२ वाजून ५ मिनिटानी समाधिस्थ झाले. ही शोकबातमी ऐकताच महाराजांचे हजारो शिष्य व त्यांचे चहाते अक्षरशः शोकाकुल झाले. क्षणभर काय करावे हे त्यांना कळेचना. त्यांचा शोक अनावर होऊ लागला पण आता काय करावे? निदान आपल्या गुरुचे अंतिम दर्शन व्हावे म्हणून जो तो वाट सापडेल त्या मार्गाने पुण्याला जाण्यास निघाला. मुंबापुरीहून त्यांची भक्तमंडळी खास मोटारीने गेली तर काही आपल्या स्वतःच्या मोटारने तर काही आगगाडीने रवाना झाली. पुणे शहरात आलेले महाराजांचे सारेच भक्त शोकाकुल झाले होते.

महाराजांच्या वासुदेवाश्रमात गुरुदेवांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेण्यासाठी स्त्री–पुरुषांची अफाट गर्दी झाली होती. महाराजांचा पार्थिव देह वासुदेवाश्रमात तळमजल्यावरील हॉलमध्ये ठेवण्यात आला होता. त्यांच्या देहावर भाविक फुलांचे हार घालीत होते. आणि प्रेमाने व श्रध्दाळू भावनेने आपल्या गुरुचे जड अंतःकरणाने व अश्रूसिंचनाने दर्शन घेत होते. पुष्पहारांचा ढीग साठला होता. मंगळवारच्या सबंध दिवस व रात्र आणि बुधवारी सकाळीही शिष्य, भाविक आणि त्यांचे चहाते यांची गर्दी वाढत होती. कित्येकाना प्रचंड गर्दीमुळे गुरुमाऊलीचे शेवटचे दर्शनही घडण्यास फार कठीण झाले.



श्रीवासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबेस्वामी

ज्या ठिकाणी महाराजांचा देह दर्शनासाठी ठेवला होता त्या ठिकाणी अखंड "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या चरणाचा जप चालला होता. आपल्या गुरुमाऊलीचे अंतीम दर्शन घेण्यासाठी थंडी, वारा, रात्र, सारे सारे काहीलोक विसरले होते. महाराजांच्या पार्थिव देहाला अधूनमधून तूप लावण्यात येत होते. मंगळवारी सकाळी स्नान करताना महाराज पडले. आश्रमातील शिष्यांनी त्यांना लगेच उचलून बिछान्यावर ठेवले. त्यावेळी ते चांगले शुध्दीत होते. 'डॉक्टरांना बोलावणे पाठवितो' असे शिष्यांनी सांगितले तेव्हां तर महाराजांनी नकार दिला. आता आमचे गुरूदेव टेम्बेस्वामी-वासुदेवानंद सरस्वती-यांचा फोटो हाती द्या. हाच डॉक्टर. आपल्या गुरुचा फोटो हाती घेऊन त्याकडे पहात नामस्मरण करीत त्यांनी महानिर्वाण केले.

निर्वाणाच्या तीन आठवड्यापूर्वीच गुळवणी महाराजांचा ८७ वा वाढदिवस साजरा झाला होता. मृत्यूपूर्वी आधी थोडावेळ नरसोबाच्या वाडीचे पुजारी अचानक येऊन त्यांनी वाडीचा प्रसाद दिला होता. "देव तुमच्या रूपाने आला होता." असे महाराज तेव्हा म्हणाले होते.

परमपूज्य योगिराज श्री. गुळवणी महाराजांचा जन्म कुडुत्री गावी मार्गशीर्ष वद्य १३ शके १८१८ गुरुवार दिनांक २३ डिसेंबर १८८६ रोजी झाला, त्यांचे नांव वामन. त्यांचे वडील दत्तभटजी वेदशास्त्रसंपन्न म्हणून प्रसिध्द होते. महाराजांच्या मातोश्रींचे नाव उमाबाई. वामनरावांच्या जन्मानंतर त्यांच्या आईवडलांनी नरसोबाच्या वाडीस जाऊन या छोट्या बालकास श्रीचरणी घालून त्यांनी तेथे महापूजा केली.

वामनरावांचे मराठी चौथी पर्यंतचे शिक्षण तारळ्यास व पुढील शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलमधे झाले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे उपनयन झाले. वडील बंधूनी संध्या, पूजा, वैश्वदेव, पुरुष सूक्त वगैरे धर्माचरणाचे शिक्षण त्यांचेकडून करवून घेतले. पंडित आत्माराम शास्त्री पित्रे यांचेकडे त्यांचे रूपावली समासचक्र, अमर कोश, रघुवंशांतील आठवा सर्ग, अज विलाप, मालविकाग्निमित्र या नाटकातील

काही अंक ,पंचांग वगैरे संस्कृत अध्ययन झाले. विद्यार्थी दशेत त्यांनी अनेक शिष्यवृत्याही मिळविल्या.

वामनरावांना बालपणापासूनच चित्रे काढण्याचा छंद होता. १९०६ साली फर्स्ट ग्रेड व १९०७ साली सेकंड ग्रेड व थर्ड ग्रेड अशा परीक्षा बोरीबंदर येथील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मधे अभ्यास करून त्यांनी पूर्ण केल्या. कोल्हापूरच्या वास्तव्यात त्यांनी छायाचित्रण कलेचे शिक्षण घेतले. त्यांनी काढलेली चित्रे लोकादरास पात्र ठरली. १९०७ साली दैवयोगाने गुरुद्वादशीच्या निमित्ताने वाडीस आलेल्या टेंबेस्वामींची व त्यांची भेट झाली.

शके १८११ च्या अनंत चतुर्दशीस टेंबे स्वामींचा मुक्काम पवनीस नामदार काळीकरांच्या मुरलीधर मंदिरात होता. त्यांचे समवेत सीताराम महाराज व गांडा महाराज होते. तेथेच मातोश्री गोदूताई, वामनराव, हिंगोलीचे शंकरराव देशमुख आजेगावकर व त्यांच्या भगिनी गं. काशिताई यानाही अनुग्रह झाला.

वामनरावांच्या आयुष्यातील तो सोनियाचा दिवस. शके १८३४ चा स्वामींचा चातुर्मास चिखलदा येथे असतानाच वामनरावांनी औदुंबर क्षेत्री जाऊन श्री दत्तमालामंत्राचे पुरश्चरण केले. स्वामींची पुनर्भेट श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे झाली. येथे टेंबेस्वामींनी दशोपनिषदे, ब्रह्मसूत्र वृत्ती, कैवल्य मौक्तिक ही उपनिषदे सांगितली. एके दिवशी वामनरावांना ताप भरलेला असताना औषधी ऐवजी स्वामींनी धौती व मयुरासन करण्याची आज्ञा केली. हीच गुरु शिष्यांची शेवटची भेट.

इसवी सन १९१७ ते १९२६ पर्यंत वामनरावजी गुळवणी बार्शी येथील म्युनिसिपल शाळा नं. १ मधे व पुढे १९२६ ते १९४२ पर्यंत पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात नोकरीस होते. त्यावेळी त्या विद्यालयाचे प्रमुख होते म. म. दत्तो वामन पोतदार, व ना. ग. नारळकर. बार्शी मुक्कामी अनेकदा ह. भ. प. दासगणू महाराजांच्या भेटीचा व कीर्तनश्रवणाचा त्यांना योग आला. येथेच श्रीमंत परमहंस परिव्राजकाचार्य चिन्मयानंद स्वामी महाराजांची भेट झाली. त्यांच्याच कृपेने वामनरावांना या योगशास्त्रामधील शक्तिपात रहस्यात्मक तंत्र शास्त्रीय वेददीक्षा लाभली व ते कृतार्थ झाले. पुढे चिन्मयानंद स्वामीच "लोकनाथ तीर्थ" झाले.

गुळवणी महाराजांच्या जीवनाची स्थित्यंतरे पाहू गेल्यास ते मुमुक्षू , जिज्ञासू, साधक व गुरुभक्त होते. त्यानंतर त्यांना गुरुपद लाभले व स्वामींच्या कृपेने त्यांना सद्‌गुरुत्व लाभले.

डिसेंबर १९५६ मधे पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात स्वामी कुवलयानंदजी यांच्या अध्यक्षतेखाली महाराजांचा अमृत महोत्सव साजरा झाला होता. या भव्य समारंभास लोकनायक बापूजी अणे, पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर व समर्थभक्त आनंददासजी रामदासी हजर होते. ता. २७ जानेवारी १९६५ रोजी कै. सोनोपंत दांडेकरांच्या उपस्थितीत 'वासुदेव निवास ' या वास्तूचा वास्तूशांती कार्यक्रम पार पडला. तर सहस्रचंद्र दर्शन शांतीमहोत्सव पद्मभूषण म. म. द. वा. पोतदार यांच्या नेतृत्वाखाली १९६७ साली पार पडला. या प्रसंगी प. पू. श्री. १००८ विष्णूतीर्थजी

स्वामी महाराज हे अध्यक्ष म्हणून लाभले. तसेच संकेश्वर करवीर पीठाधीश श्रीमंत जगदगुरु शंकराचार्य वाडीकर जेरेस्वामी महाराज यांनी श्रीफल महावस्त्र व 'योग चूडामणी' ही बहुमोल पदवी त्यांना देऊन गौरविले.

श्री गुळवणी महाराजांचे संबंधात थोर साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे लिहितात "नाशिकचे श्री गजानन महाराज गुप्ते, सज्जनगडचे भगवान श्रीधर स्वामी महाराज व पुण्याचे श्री गुळवणी महाराज यांच्या विषयी माझ्या मनात नितांत आदर असून मी त्यांचे चरणी सतत नतमस्तक असतो. तर कै. पं. श्री. दा. सातवळेकर लिहितात. "पूजनीय वामनरावजी गुळवणी यांचे अनेक शिष्य आहेत मला तर पहिल्याच दिवशी ध्यानमग्न होण्याचा लाभ झाला. त्यामुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात मोठी श्रध्दाभक्ति आहे.

गुळवणी महाराजांचा साराच जीवनपरिचय सागरासारखा अथांग आहे. मुंबई महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतात त्यांचे अगणित शिष्य आहेत. महाराजांची कांती तेजस्वी होती. त्यांचा स्वभाव मोठा प्रेमळ होता. त्यांच्या चेहऱ्यावर सतत हास्य विलसत असे. त्यामुळे त्यांच्या दर्शनाने मनाचे समाधान होत असे. संत एकनाथ महाराजांनी संसारात राहून आपल्या तपाने सर्वांस त्या काळात पावन केले. आजच्या या आधुनिक काळात प. पू. गुळवणी महाराजांनी सर्वसामान्य लोकांप्रमाणे राहून आपल्या तेजाने, दर्शनाने आणि पावित्र्याने सर्वांस पावन केले.

राजा, मंत्री आणि सत्ता यामुळे सर्व काही प्राप्त होते. पण जो राजा नाही, मंत्रीही नाही किंवा सत्ताधारीही नाही पण अशा श्रेष्ठ पुरुषांच्या पायाशी प्रत्यक्ष कुबेर सर्व साधनांनी हजर होतो. महाराजांच्या अग्निसंस्कारासाठी म्हैसूरहून त्यांच्या भक्तांनी एक टन चंदन पाठविले तर दुसऱ्या काही भक्तांनी पवित्र कार्यासाठी एक लॉरी भरून गाईच्या शेणी पाठविल्या. यावरून सिध्द पुरुष हे भगवंताचे अवतार असल्याने त्यांच्या दासीप्रमाणे ऋध्दि सिध्दी उभ्या असतात. हाच भगवंत आणि परमेश्वर. संतपुरुष म्हणजेच भगवंत, ईश्वर. चांगदेवाला प्रत्यक्ष पांडुरंगाने सांगितले होते की तुला गुरुवाचून गत्यंतर नाही. गुरुवाचून माझे खरे दर्शन होणार नाही. म्हणून चांगदेवानाही गुरु करावा लागला. 'गुरुबिना कौन बतावे बाट' हेच खरे.

गुळवणी महाराजांचे वैभव फार थोर होते. त्यांच्या अंतीम दर्शनासाठी अखिल महाराष्ट्रातून आणि भारतातून भक्तगण हजर होते आणि महाराजांच्या वैभवाची साक्ष देत होते. बुधवार ता. १६ रोजी दुपारी बारा वाजता वासुदेवाश्रमातून निघालेली अंत्ययात्रा पुणे शहरातून विविध मार्गांनी दुपारी तीन वाजता वैकुंठभूमीत गेली. वैकुंठभूमीत जवळ जवळ वीस हजार भक्तसमुदाय शोकाग्नीत ढळढळ अश्रू ढाळीत गुरुचे नामस्मरण करीत होता. शेगावचे श्री गजानन स्वामी यांच्या महानिर्वाणानंतर शोकाग्नीने तडफडणाऱ्या त्यांच्या काही भक्तांना ते प्रत्यक्ष दर्शन देतात. त्याचप्रमाणे गुळवणीमहाराजांनीही आपल्या सत् शिष्याना अधूनमधून दर्शनलाभ द्यावा. आज आपल्या देशाला संकटमुक्त करण्यासाठी महाराजांसारख्या सिध्द पुरुषाची आवश्यकता आहे. कारण जनताजनार्दनाचे दुःखनिवारण करणारे तेच एक आधार असतात.

ललित चरित्र :—

# साईनाथ

## श्रीसद्गुरू साईमहाराज चरित्र

(लेखक :— श्री. पुजारी, पुणे)

### मानेवर अंकुश टोचू लागतो तेव्हाच हत्तीचे पाऊल वळले

संध्याकाळच्या सुमारास टांगा एका गावाजवळ येऊन थांबला. हातातील चाबूक पुढच्या बाजूस खोवून टांगेवाला खाली उतरला. आतील स्वारीला म्हणाला, "साहेब! मी आलोच. आपण बसावे. उतरू नये."

आतील स्वारीने त्याला विचारले, "अरे! हीच ना शिरडी? मघाशी तूच म्हणालास ना, शिरडी आली म्हणून!"

टांगेवाल्याचा चेहरा ओशाळा झाला. दिलगिरीच्या स्वरात तो म्हणाला, "नाही साहेब! ही शिरडी नव्हे. हे निमगाव. शिरडी आता एका हाकेच्या अंतरावर राहिली बघा."

कुणाच्याशा भाकरीचे गाठोडे घेऊन टांगेवाला पुन्हा वर चढला. कर्तव्यात कसूर नको म्हणून त्याने घोड्याला एक फटकारा दिला. त्यासरशी घोडे चौखूर सुटले. हा हा म्हणता निमगाव मागे पडले.

टांगेवाला आपण होउनच सांगू लागला, "आता मागे गेलेले गाव म्हणजे जाळी-निमगाव. सरदार डेंगळ्याचे गाव. रहाते निमगाव यांच्या मधोमध उभे राहिल्यास नाकासमोर जे गाव दिसते तीच शिरडी."

टांग्यातील स्वारीने नीट बसून एकवार वळून पाहिले.

शिरडी गाव अगदी समोरच दिसले. महाद्वारात येऊन उभे राहिल्यानंतर समोर मूर्ती दिसावी तसे!

टांग्यातील त्या उतारूने न कळतच दोन्ही हात जोडले.

मनाशी म्हणाला: अहंकारामुळे माणसास वाटते की पाय जर माझे तर त्यांना चालविणारा मुख्यत्यारही मीच! माझ्या पायांना माझ्या मर्जीनुसार मी हवे तेथे नेऊ शकतो! पण हे खरे नाही. आज संध्याकाळी मी या रानात असेन असे भविष्य कोणी सांगितले असते तर मी त्यावर यत्किंचितही विश्वास ठेवला नसता.

घोडा जोराने हांकता हांकता टांगेवाला सांगू लागला, "बाबांची स्वारी परवा परवापर्यंत या रानातून फिरताना दिसे. अगदी एकटी. आपल्याच तंद्रीत. उन्हाळा कितीही कडक असो-सावलीला त्यांना बाभळीची एक लहानशी फांदी बस्स!

"कधी लहर लागली तर भर उन्हाचे निमगावला बाबासाहेब डेंगळ्याकडे जातील. कधी रहात्याला चंद्रभान शेट मारवाड्याकडे जातील. पण हिंडणे-फिरणे काय ते एवढ्या दोन तीन मैलातच. त्याच्या पलिकडे नाही."

दिवे लागणीच्या सुमाराला टांगा शिरडीत आला.

आतील स्वारीचे अंग प्रवासाने अगदी आंबून गेले होते. तरी पण मनाचा उत्साह कायम होता. बाबांविषयी जेवढे म्हणून कळेल, कानावर येईल तेवढे अपुरे होते. म्हणून टांगेवाल्याचे बोलणे तो मोठ्या भक्तीने ऐकत होता. अधिक माहिती मिळावी म्हणून उत्तेजन देत होता.

टांगेवाला अजूनही भारावलेल्या मनस्थितीतच होता. सांगत होता, "बाबांचे सामर्थ्य काय वर्णन करावे? बाबासाहेब डेंगळ्यांचे भाऊ नानासाहेब. त्यांना दोन कुटुंबे. पहिल्या कुटुंबास मुलबाळ होईना, म्हणून दुसरे कुटुंब केले. पण पुष्कळ वर्षे गेली तरी घरात पाळणा हलेना. वंशास दिवा होईना.

"नानासाहेब सरदार घराण्यातील. त्यांना कशास काय कमी! डॉक्टर-वैद्य हकीम सर्व केले. देव, देवऋषी नवस सर्व करून झाले. पण गुण नाही. शेवटी सहज विचारावे तसे बाबांना विचारले. बाबांनी ओटयात नारळ टाकला. म्हणाले, जा. तुला मुलगा होईल."

आणि पुढे लवकरच वहिनीसाहेबांना मुलगा झाला. मोठे गावजेवण घातले. तेव्हापासून बाबांचा महिमा खरा वाढला. पाठीला भाकरी बांधून माणूस शिरडीला येऊ लागले. बोललेला नवस येऊन फेडू लागले.

नगरच्या कलेक्टरांचे चिटणीस श्री. अण्णासाहेब गाडगीळ सहकुटुंब शिरडीस कोणामुळे येऊन गेले हे टांग्यातील त्या व्यक्तीच्या आता ध्यानी आले.

डेंगळे मंडळी मोठी. सरकार दरबारी त्यांची कामेही पुष्कळ. कलेक्टरापर्यंत सर्व अधिकाऱ्यांशी त्यांचे संबंध. ओळखी. परिचय. ते नानासाहेब डेंगळेच स्वत: गाडगिळांकडे बाबांविषयी बोलले असतील. त्यामुळेच गाडगीळसाहेब बाबांच्या दर्शनासाठी या शिरडीस येऊन गेले असतील.

जे कलेक्टर कचेरीत पिकले, ते मामलेदार - कचेरीत विकले. आमच्या कचेरीत ही बातमी पोचण्यास कितीसा उशीर! मनास वाटले: तालुक्यातील लोकांना ज्यांची दाद नाहीं ते जिल्ह्याच्या ठिकाणी माहित होऊन तेथील लोक शिरडीला येऊन सुद्धा गेले! आणि आम्ही मात्र बसलो आहोत हातात नकाशा घेऊन, त्यावरील आमच्या तालुका सर्कल मधील गावे मोजत!

हे गाव तरी तालुक्यापासून – कोपरगावापासून किती दूर? अवघे नऊ मैल. गोदावरी ओलांडली की सरळ रस्ता. मधे डोंगर दरी पहाड काही नाही. तरी हे गाव आम्हाला नऊ योजना प्रमाणे होऊन बसले! कचेरीतून पाऊल काही निघेना! कसे निघणार? अंकुश मानेवर टोचू लागतो तेव्हाच हत्तीचे पाऊल योग्य दिशेकडे वळते.

टांगा शिरडीत येऊन उभा राहिला.

टांगेवाल्याने खाली उतरून आदबीने विचारले, "साहेब! आपले या गावात कोणी ओळखीचे ? पै-पाहुणे ?"

टांग्यातील स्वारीने मानेनेच नकार दर्शविला.
हे पाहून टांगेवाला क्षणभर बुचकळ्यात पडला .

स्वत:शीच म्हणाला आता काय करावे ? या सवारीला कोणाच्या घरी सोडावे? असे कोणाकडेही उतरणारी ही सवारी दिसत नाही. साहेब दिसते. अशा सवारीची व्यवस्था नीट लागली पाहिजे.

टांगेवाल्याने आपली अडचण जवळून निघालेल्या आपल्या एका मित्रास सांगितली.

तो मित्र टांग्यातील सवारीकडे एकवार पाहून घेऊन खालच्या आवाजात म्हणाला, "त्यांना जा की काशीरामाच्या घरी घेऊन . साधुसंत नसले म्हणून काय झाले? बाबांच्या दर्शनालाच ते आले आहेत ना ? मग काशीरामाकडे त्यांना पोचवायला काही हरकत नाही.

"म्हाळसापती, माधवराव हेही त्यांना तेथे भेटतील. त्यामुळे मशीदीकडे नेणे, बाबांचे दर्शन करविणे हेही सोपे जाईल. तर तू तसेच कर. त्यांना काशीरामच्या घरी पोचव. तो आज बाहेरगावी कोठेही बाजारासाठी गेलेला नाही. घरीच आहे."

टांगेवाल्याने टांगा वळविला.

काशीरामाच्या घरी नेला.

खाली उतरून टांगेवाल्याने आत जाऊन काशीरामाला निरोप देण्याचाच अवकाश. काशीराम धावतच बाहेर आला. टांगेवाल्याच्या हातातील वळकटी मोठ्या लगबगीने आपल्या खांद्यावर घेतली . मोठ्या नम्रपणे म्हणाला, "या साहेब ! या. काही परकेपणा मानू नका. हे घर माझे नव्हे. बाबांचे. बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांना उतरण्यासाठीच हे घर आहे."

काशीराम पुन्हा आत धावला.

हातपाय धुण्यासाठी साहेबांना तांब्याभर पाणी, पाय पुसण्यासाठी पंचा घेऊन उभा राहिला. मग गूळ पाणी साहेबांच्या समोर ठेवून म्हणाला, "घ्या साहेब ! थोडे पाणी घ्या, म्हणजे बरे वाटेल. अंगातील शीण जाईल."

काशीरामाच्या सोप्यावर तक्क्याला टेकून कोपरगावचे ते गृहस्थ हातपाय लांब करून विश्रांती घेऊ लागले आणि त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यासाठी काशीराम पुन्हा आंत गेला.

**ज्याच्यावर गुरुकृपा झाली त्याच्यासारखा भाग्यवान जगात दुसरा नाही.**

रात्रीचे अकरा बारा तरी वाजले असतील .

कोपरगावचे ते साहेब अजून जागेच होते. अंथरुणात तळमळत होते. एकीकडे मनास आशा वाटत होती. दुसरीकडे मन एका क्षणात उदास होत होते.

साहेब मनाशी म्हणत होते: प्रारब्धाच्या पलिकडे कोण गेला आहे? ब्रह्मदेवाने एकदा कपाळावर लिहिलेली दुष्टाक्षरे पुसून त्यांच्या जागी सुष्टाक्षरे लिहिण्याचे सामर्थ्य कोणात आहे.? तीनच नव्हे तर दहा लग्ने एखाद्याने मुलासाठी केली तरी त्याला मूल होईल – संततिची प्राप्ति होईल याची खात्री काय ?

त्या गृहस्थाना आपल्या तीनही स्त्रिया डोळ्यांसमोर दिसू लागल्या. कपडालत्ता, दागदागिना, हौसमौज– कशालाही त्यांना काही कमी नव्हते. पण चेहऱ्यावर हास्य नव्हते. घरात आनंदाची किरणें नव्हती. जणू सूर्याचा उदय त्या घरात कधी होणार नव्हता. .

त्या स्त्रियांचे फिकट चेहरे, उदास डोळे, आसवे, उसासे पाहवत नव्हते. जणू त्या तीन शापित स्त्रिया सावल्यांप्रमाणे मूकपणे घरात वावरत होत्या. भुताप्रमाणे रात्री-बेरात्री मनाचा थरकाप उडवीत होत्या. आपल्या पतीच्या उशाशी बसून निःशब्दपणे त्याला खडसावीत होत्या. शाप देत होत्या. म्हणत होत्या. तुझे प्रारब्ध तुला माहित होते, तर या नरकात आम्हास लोटून तू काय मिळविलेस? आता आम्हीही तळतळून तुला शाप देतो की आमचे दुःख स्त्री होऊन जन्मोजन्मी तू भोगशील. सत्ता, संपत्ती कितीही लाभली तरी कधीही तुला जन्मोजन्मी संतती म्हणून लाभणार नाही. ते सुख तुला कधीही मिळणार नाही.

त्या गृहस्थांचे मन एकीकडे भयभीत झाले. दुसरीकडे काशीरामाचे शब्द आठवू लागले. बाबांच्या एक एक आठवणी सांगता सांगता काशिराम गहिवरत होता. बोलण्याचे थांबत होता. शेवटी आवंढा गिळून एखादेच वाक्य बोलत होता, "साहेब! काय सांगू? ज्याच्यावर गुरुकृपा झाली त्याच्या सारखा भाग्यवान जगात दुसरा नाही."

काशीरामाचा शब्दन्‌शब्द त्या गृहस्थाना आठवू लागला, त्या शब्दांना सुगंध होता. ओलावा होता. तेज होते. जणू तो प्रत्येक शब्द गुरुलीलामृताने भिजून, पवित्र होऊन एका गुरुभक्ताच्या मुखातून गंगेप्रमाणे स्त्रवत होता.

काशीराम सांगत होता "साहेब! गुरुभक्तीचा मार्ग काट्याकुट्यातून जाणारा. तेथे माणूस कंटाळतो, लोकनिंदेच्या ओरखड्यानी रक्त बंबाळ होतो. मागे पळून येतो. पण जो एकदा गुरुपदाशी पोचला तो कितीही घसरला तरी त्याची चिंता सद्‌गुरूना अशा भक्ताच्या प्रारब्धाची दोरी सद्‌गुरूंच्या हाती."

ज्याच्या प्रारब्धाची दोरी सद्‌गुरूनी हाती धरली, दुःखाच्या खाईतून ज्याला वर काढले अशा एखाद्या भक्ताची गोष्ट आता आपल्या कानी येणार म्हणून कोपरगावचे ते पाहुणे सावध झाले. उठून नीट बसले. म्हणाले, "सांगा महाराज, असा अनुभव येथे कोणाला आला?"

काशीराम नम्रपणे म्हणाला " दुसऱ्या कोणास कशास? मला स्वतःसच आला तो सांगतो, ऐका.

"आम्ही जातीने नामदेव शिपी. बाजारच्या दिवशी गावोगावी जावे, बाजारात बसून कापड विकावे हा माझा धंदा. दिवसभर बाजारात कापड विकावे. संध्याकाळी बाजार उठेल तसा आपला माल गोळा करावा तो घोड्यावर नीट लादावा; पैशांचा कसा कमरेला घट्ट कसावा आणि गावाची वाट पुन्हा धरावी, अशी आमची नेहमीची पद्धत."

"एक दिवस नाऊरच्या बाजाराहून परत येत होतो. घोड्यावर माल होता. कमरेला रुपयांचा कसा होता. रात्र फार झाली होती. तरी पण सद्‌गुरूकृपेने सोबत लाभली. बाजार करून काही गाड्या माझ्या पुढेच चालल्या होत्या.

"एवढ्यात काही लुटारू भिल्ल कोठून तरी आले. काठ्या, कुऱ्हाडी, तलवारी भाले परजून त्यानी माझ्या समोरच्या बाजाराच्या गाड्या अडविल्या. लुटीसाठी दमदाटी करू लागले. त्या लोकांना मारू लागले.

"गाड्या त्यांनीं संपूर्ण लुटल्या . मग केवळ जाता जाता म्हणून माझ्याकडे मोर्चा वळविला. घोड्यावरील कापडांचे सर्व गठ्ठे त्या अंधारात हातोहात लांबविले.

"तरी मी काही बोललो नाही. ओरडलो नाही. प्रतिकारही केला नाही. हे पाहून त्यांना आणखीच चेव आला. माझ्याशी अंगलट करून कमरेच्या कश्याला हात घालून ओढू लागले.

"मग मात्र मी घाबरलो. कसा कमरेशी घट्ट धरून ठेवला. मनाशी म्हणालो : देवा ! कसा चोरीस गेला तर खुशाल जावो. फार तर त्याच्यातील रुपये जातील. पण कश्याशी करकचून बांधलेले हे छोटेसे गाठोडे चोराच्या हातास न लागो.

"साहेब ! गुर्वाज्ञेइतके जपण्यासारखे मूल्यवान जगात दुसरे काहीही नाही. प्रारब्धाच्या विषारी विळख्यातून सुटका व्हावी म्हणून सद्‌गुरूंच्या पायी बसून एक दिवस मी रडू लागलो. तेव्हा दयाळू सद्‌गुरु जानकीदास बाबा मला म्हणाले : काशीराम तू एक करीत जा. गोष्ट अगदी सोपी आहे. पिठी साखरेची एक छोटीशी गाठोडी नेहमी जवळ बाळगावी. पैशाच्या कशास आपण कसे जपतो, तसे तिला जपावे. मुंगी दिसली की तिला साखर घालावी.

"साखरेचे ते गाठोडे चोरीस जाते की काय अशी मला सारखी धास्ती. म्हणून चोरानी गाठोड्यास हात घातलाच तर प्राणपणाने आपण प्रतिकार करावा असे मी ठरविले. गुर्वाज्ञेचा भंग माझ्या हातून न होवो म्हणून मनातल्या मनात मी सद्‌गुरूंची प्रार्थना करू लागलो. म्हणालो : सद्‌गुरो ! हे व्रत तुम्ही मला सांगितले. ते या क्षणापर्यंत पाळत आलो. आता मात्र या व्रताचे रक्षण तुम्ही करा. मला दुर्बळाला या क्षणी धैर्य द्या."

"आणि कशी कोण जाणे , त्या काळोखात रस्त्यावर पडलेली एक लखलखती तलवार मला दिसली. ती मी उचलली. तोच दोन चोर समोरून माझ्या अंगावर धावून आले.

"पुढे काय झाले मला कळले नाही.

"शुद्धीवर आलो तेव्हा कळले की बेशुद्ध होऊन मी रस्त्यावर पडलो आहे. कुऱ्हाडीचा एक घाव मागील बाजूने माझ्या डोक्यावर बसला आहे.

"परंतु त्यापूर्वीच हातातील तलवारीने दोन चोराना मी नकळतच ठार केले होते. यांची प्रेते मी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या समोरच रस्त्यावर पडलेली मला दिसली.

"साहेब ! जे माझ्या अनुभवाचे तेच सांगतो : सद्‌गुरूवर श्रद्धा ठेवली, त्यांची आज्ञा तंतोतंत पाळली की त्याना दयेचा पान्हा फुटतो. आपली सर्व चिंता ते वाहातात. प्रारब्धाची दोरी तुटण्याची वेळ आली तरी भक्ताला खाली पडू देत नाहीत. उचलून पोटाशी धरतात. म्हणतात. अरे ! आता मेला होतास ! देवाची दया म्हणून वाचलास !

"देव आणि सद्‌गुरू कधींच भिन्न नसतात. एक निर्गुण निराकार; दुसरे सगुण साकार, बोलते चालते, हसते, नाना लीला करून भक्तांचे रक्षण करणारे.

"मी जखमी, म्हणून लोक मला इस्पितळात नेऊ लागले. त्यांना वाटले, डॉक्टर मला बरे करतील. पण मला डॉक्टरांचा विश्वास वाटेना.

"मी म्हणालो आयुष्याची दोरी जवळ जवळ तुटली होती अशा वेळी सद्‌गुरूनी ती बळकट केली. आता या यःकश्चित जखमेचे ते काय ! मला घेऊन शिरडीस चला. बाबांच्या चरणी मला घाला. हे मडके जर फुटणेच असेल तर बाबांच्या पायाशी फुटू द्या.

"साहेब ! मी बरा झालो. सद्‌गुरूच्या पायाखालच्या नुसत्या मातीने बरा झालो. इतकेच नव्हे तर सरकार दरबारी माझा मोठा सन्मान झाला. दोन चोरांना ठार करण्याचे शूर कृत्य मीच केले असे समजून सरकारने मला एक तलवार बक्षीस दिली !

"मी दुर्बळ भित्रा. पिढयान् पिढया हातात चिपळया असलेला. माझ्या हातात ती मर्दाची तलवार कशी शोभणार ?

"तरी पण मी विचार केला : ही सर्व सद्‌गरूंची इच्छा. ती मी का मोडावी ?"

"ती तलवार मी हाती घेतली. तिच्यावर माथा टेकवाला. सद्‌गुरूंच्या शुभ चरणी ती बक्षिसी अर्पण केली. म्हणालो : सद्‌गुरो ! माझा प्रत्येक श्वास जर तुमच्या सत्तेने चालणारा, तर या पराक्रमाचे कर्तृत्व मी स्वतःकडे कसे घेऊ ? तुमचे म्हणून ते तुमच्याच चरणी अर्पण करतो.

"साहेब ! सर्वांनी मूर्खात काढलेला या शिरडीचा मी काशीराम शिंपी. पण सरकार दरबारी माझे नाव झाले. वर बहाद्दरीची तलवार बक्षिसी मिळाली.

"खरोखर सद्‌गुरूंनी जर एखाद्याला आपला म्हटले तर ते त्याला काय देणार नाहीत. ! तलवारच नव्हे तर आपल्या हातातील सुदर्शन चक्र प्रभु त्याच्या हातात देतील. आपल्या गळयातील वैजयंती माळा त्याच्या गळयात घालतील. म्हणतील: "बोल. तुला आणखी काय देऊ ?"

"देव देऊ लागले तरी आम्ही पामरानी दोन हातानी किती घ्यावे ! म्हणून चरणी एकच प्रार्थना :

हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥

न लगे मुक्ती धन संपदा। संतसंग देई सदा॥"

बोलता बोलता काशीरामाचा कंठ दाटून आला.

डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या.

त्या पुसून काशीराम म्हणाला, "साहेब ! आता रात्र फार झाली. आपण झोपा. पहाटे मी आपणास लवकर उठवीन."

कोपरगावचे ते गृहस्थ अंथरुणावर आडवे झाले.

मनाशी विचार करू लागले: खरोखर, हे साईमहारज फार श्रेष्ठ दर्जाचे गुरू असले पाहिजेत. कारण त्यांचा कृपा प्रसाद लाभलेला हा अडाणी काशीराम मला अतिआदरणीय वाटत आहे. याच्या सहवासात माझे मन जणू स्वच्छ होत आहे, निर्मळ होत आहे.

**देवाच्या दर्शनाला दुसरे काय लागते ? एक शुद्ध भाव !**

पहाटेच्या सुमारास त्या गृहस्थाना जाग आली.

काशीराम त्यांच्या समोरच उभा होता. त्याचे स्नान वगैरे केव्हाच उरकले होते. दोन्ही हात जोडून पाहुण्यांना तो म्हणत होता "स्नानाचे पाणी तापले आहे. आपण स्नान करा की आपण बाबांच्या दर्शनाला जाऊ."

अत्यंत सात्त्विक चेहरा . कपाळावरील गंध. आर्जवी वाणी. काशीराम ज्ञानोबा नामदेवरायांच्या काळातील भक्त वाटत होता. जणू कामक्रोधादींचा लय झाल्यामुळे केवळ प्रेमस्वरूप होऊन तो आता उरला होता.

पाहुण्यांना स्नानासाठी पाणी काढून देता देता काशीराम सांगू लागला., "साहेब बाबांच्या लीला वरवर पाहाता फार विचित्र-वागणे--बोलणेही काही वेळा फार तुसडेपणाचे. दर्शनाला आलेल्या एखाद्या माणसाच्या अंगावर धावून जातील. त्याला शिव्यांची लाखोली सुद्धा वाहातील. पण ते आपण मनावर घ्यायचे नाही.

"स्वच्छ करण्यासाठी घागरीला आतून – बाहेरून आधी मातीच फासतात. पाण्याने ती चांगली धुतात. मगच तिला विहिरीत सोडतात.

"बाबांचे बोलणे, रागावणे, शिव्या देणें– हे सर्व असे ! पण बाहेरच्या भक्तांना याची कल्पना आधी येत नाही. कित्येकजण गैरसमज करून घेतात. म्हणतात: या वेड्या माणसाच्या नादी मी उगाच लागलो."

स्नान करून पाहुण्यानी आपली वस्त्रे बदलली.

काशीरामच्या देवा समोर जाऊन, हात जोडून ते उभे राहिले. मनात विचार आला : खरोखर देव आणि भक्त यांच्यांत केवढे हे साम्य ! काशीरामाच्या देव्हाऱ्या-तील या मुर्तीही अशाच साध्या, सोज्ज्वळ, संतुष्ट, या मूर्तींना कोणतेही उपचार नकोत. डोक्यावर पाणी घालून एक गंधाची टिकली चिकटवली की झाले ! या पूर्ण समाधानी.

"नित्य वहात रहाणे हा गंगेचा स्वभाव धर्म. काशीराम पुन्हा बोलू लागला. तेही गुरू विषयीच. भक्तावरील त्यांच्या प्रेमाविषयीच. जणू या प्रातःकाली मुखाने तो गुरुस्तवन करीत होता. गुरुलीलामृताची पारायणे करीत होता.

काशीराम सांगू लागला, "साहेब! बाबांनी ज्याना एकदा आपले मानले त्यांच्या भाग्याचा हेवा किती करावा!

"म्हाळसापती आणि तात्या या दोघानाच मशिदीत आपल्या बरोबर झोपण्याची परवानगी. तिघांनी तीन दिशाना पथाऱ्या पसरल्या की झाली गोष्टीस सुरुवात.

"ते–पोर तात्या फार गोष्टी वेल्हाळ. त्यातून बाबांच्या गोष्टीची त्यांना एकदा चटक लागलेली. मशीदच त्याला घरापेक्षा गोड. पण गोष्टी झाल्या तरी कोणी किती वेळ जागणार! केव्हा तरी हसता हसता सुद्धा डुलकी येणारच! माणूस पेंगून आडवे होणारच!

अशी डुलकी त्या पोराला आली की बाबांनी उठावे. त्याला शुद्धीवर आणावे! हूं हूं म्हणत तो पुन्हा घोरू लागला की त्याचे पाय धरून त्याला चांगला उलथा पालथा करावा गुदगुल्या कराव्यात. डोके हलवून जाग आणावी. म्हणावे: "तात्या! अरे, एवढयात झोपलास! ऊठ मर्दा! गोष्ट अजून पुरी झाली नाही."

"बाबांच्या या पोरचेष्टेत म्हाळसापतीनीही सामील व्हावे. दोघांनी मिळून तात्यांचे तळपाय घट्ट दाबावेत. पाठ, खांदे धरून गदगदा हालवावे. तरीही तो उठत नाही असे दिसले तर त्याला गुदगुल्या कराव्यात. म्हणावे: तात्या! अरे, आत्ता तर चांगला गोष्टी करीत होतास! एवढ्यात कशी काय तुला झोप आली! का झोपेचे नुसते सोंग करतोस! सोंगच रे सोंग!

"तात्या हा असा भाग्यवान मुलगा. म्हाळसापतींची पुण्याईही अशी थोर म्हणूनच त्याना अखंड गुरुसहवास लाभला. साहेब! माझे भाग्य म्हाळसापती इतके थोर नाही. तरी त्यांच्या खालोखाल आहे एवढेच सांगतो.'

काशीराम एक क्षणभर स्तब्ध झाला.

मग दुसऱ्याच क्षणी भारावून बोलू लागला–

"साहेब, बाबा सुरुवातीला येथे आले तेव्हां मला वाटले: इतर साधुसंतांची सेवा मी करतो, तशी बाबांची ही सेवा करावी. त्याना चिलीम, तंबाखू, लाकडाचे ढलपे- जे जे म्हणून लागते ते ते सर्व पुरवावे. शिवाय त्यांच्या हातावर पै–पैसाही ठेवावा. म्हणजे त्यांना कसली ही अडचण उरणार नाही.

माझ्या इच्छेनुसार बाबा माझ्याकडून रोज पैसा दोन पैसे घेऊ लागले. त्यामुळे मला एक प्रकारचा सूक्ष्म अहंकार निर्माण झाला. भेटेल त्याला मी सांगू लागलो: बाबा माझ्याकडून पैसा –दोन पैसे घेतात. मी त्यांना न चुकता देतो.

पुढे पुढे हा अहंकार इतका वाढला की एखादे दिवशी बाबांनी माझ्याकडून पैसे घेतले नाही तर मला अतिशय वाईट वाटे. डोळ्यातून अश्रू येत. परंतु त्यावेळी मला कळले नाही की हे अश्रू प्रेमाचे नव्हते. अहंकाराचे आहेत. साहजिकच मी बाबांना दुरावू लागलो.

एक दिवस बाबांनी हे जाणले की काय नकळे. कारण त्या दिवसापासून न चुकता रोज माझ्याकडे पैसे मागण्याचा सपाटा त्यांनी सुरू केला.

परंतु त्या वेळी माझी परिस्थिती घसरल्याने ते मला शक्य होईना. एखादा दिवस असा येई की बाबांना देण्यासाठी माझ्याहाती एक पै सुद्धा येईना.

हे ही बाबांनी अंतर्ज्ञानाने जणू जाणले.

कारण ते मला म्हणू लागले, "काशीराम! मागे कापड विक्री करून आलेल्या पैशाची थैली तू जशीच्या तशी माझ्यापुढे ठेवीत होतास. आता एका पैशाला सुद्धा महाग झालास वाटते!

"बरे, बरे! ते काही असो! आताच्या घटकेला माझी सोय झाल्याशी कारण! तर वाण्याकडे जा आणि दोन पैसे मागून आण."

माझी परिस्थिती अतिशयच घसरलेली. वाणी तरी मला किती दिवस पैसे देत रहाणार? एक दिवस त्यानीही मला स्पष्टपणे सांगितले, "हे बघा, व्यवहार सर्वांनाच आहे. मागील द्यावे पुढे न्यावे. त्यामुळे गोडी रहाते. प्रेम वाढते. उणा अधिक शब्द तोंडून गेला असल्यास चूकभूल द्यावी घ्यावी."

धंद्यातील माणसाची जीभ फार गोड. काय समजायचे ते मी समजलो. घरी आलो. देवासमोर बसून झालेल्या अपमानामुळे रडू लागलो. रडता रडता म्हणालो, "बाबा! मी देणारा, मी दाता, मी उदार अशी माझ्या मनाची समजूत मी खुळेपणाने करून घेतली म्हणून तर मी परिस्थितीने असा घसरलो नाही!"

एकदम डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

देवांच्या जागीं बाबांची मूर्ती दिसू लागली.

फजित पावलेल्या एखाद्या लहान मुलाकडे पाहून वडिलानी कौतूकाने हसावे तसे बाबा माझ्याकडे पाहून हसत होते. जणू म्हणत होते, "काशीराम! अरे वेड्या, देणारा तू कोण?

"तांब्याभर पाणी समुद्रात ओतून मी समुद्राला 'जलदान केले' म्हणण्या पैकीच हा वेडेपणाचा प्रकार! अरे, तांब्यात जे पाणी आले ते तरी कोठून? विहिरीतून? छे:!' तेही मूळचे त्या समुद्रातीलच!

"त्या क्षणापासून 'देणारा मी' ही भावना गेली. ती राजस तळमळ गेली. उरला तो एक शुद्ध भाव. तो मात्र कोणत्याही विकल्पामुळे कधीही गढूळ न होवो एवढीच बाबांच्या चरणीं प्रार्थना.

"साहेब! एखाद्याला खरे वाटणार नाही. तरी पण सांगतो की त्या क्षणापासून मी –माझे ही भावनाच मेली. बाजारात जाऊन, सावलीसाठी पाल उभे करून माल मांडून बसलो तरी मनाची भावना एकच: हा माल बाबांचा आहे. विकणारे बाबा आहेत; आणि विकत घेणारेही बाबाच आहेच. मी केवळ एक कळसूत्र बाहुली! त्यांच्या हुकमाचा ताबेदार!"

काशीराम मनमोकळेपणी हसला.

त्या हास्यामुळे त्या अंधाऱ्या खोलीत जणू सूर्यप्रकाश आला.

एक क्षण भर पाहुणे स्वस्थ बसले. आपल्या मनाची मलिनता त्याना आतल्याआत अस्वस्थ करू लागली. आपण किती स्वार्थी मतलबी, कुटिल असे त्याना वाटू लागले. फार तीव्रपणे वाटू लागले.

दुसऱ्या क्षणी ते उठले.

काशीरामाला म्हणाले, "महाराज! आपण निघायचे ना आता बाबांच्या दर्शनाला? बाबांसाठी मी बरोबर काय घेऊ? मी समोर ठेवलेल्या वस्तूचा स्वीकार बाबा करतील ना? मला त्यांच्या पायाना स्पर्श करून दर्शन घेऊ देतील ना?"

त्या गृहस्थाची ही स्थिति ध्यानी घेऊन काशीराम म्हणाला, "साहेब! देवाच्या दर्शनाला दुसरे काय लागते! एक शुद्ध भाव असला की पुरे. बाकी त्याला काहीही नको. चला. दर्शनाची वेळ हीच आहे. आपण सरळ तिकडेच जाऊ."

**राधा–कृष्ण लीलांची लालित्यपूर्ण**
**गीते गाणारे शिवभक्त कवि–**

# विद्यापती

**श्री. विनायक पाठक**
साहित्यरत्न

**हिंदीचे आद्य कविः**

राधाकृष्ण लीलांचे भावमधुर वर्णन गेय गीतातून करणारे जयदेव हे संस्कृत साहित्यातील आद्यकवी होत. त्यांच्या 'गीत गोविंद' ने जनमानसाचे भाव विश्व जणू झपाटल्यागत दिसत होते. 'गीतगोविंद' व त्यांच्या अनेकविध ललित पदावलीतील भक्तिगीतांची व भावपूर्ण गेय गीतांची परंपरा हिंदी साहित्यालही आली, व त्या परंपरेचे बोट धरूनच कवि विद्यापती यांनी हिंदी साहित्याच्या वीरगाथा कालानंतर राधा–कृष्ण हाच एकमात्र ध्यास घेऊन सुंदर सुंदर गेय गीतांची रचना केली व कृष्ण-भक्त कवींना गीतकाव्यांची गोडी लावली आणि म्हणूनच विद्यापती हेच हिंदीचे आद्य कवि होते हे मत सर्वमान्य झाले आहे.

**संक्षिप्त चरित्र :**

विद्यापती ठाकूर यांचा जन्म विक्रम संवत १४०७ मध्ये मिथिला प्रांतातील बिसपी नामक गावी एका प्रसिध्द पंडित घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गणपती ठाकूर व मातोश्रीचे नाव गंगादेवी असे होते. ठाकूर घराण्याला विद्यादेवीचे जणू वरदानच असल्यामुळे प्रगाढ पांडित्य व राजमान्यता या दोन्ही गोष्टींचा वारसा वंशपरंपरेनेच विद्यापतीच्याही वाट्याला आला होता. विद्यापतीच्या पत्नीचे नाव चंदनदेवी होते. त्यांना तीन मुले व एक मुलगी अशी संतती होती.

**शिवभक्तीचा कळसः**

तसे पाहिले तर विद्यापती शिवभक्त होते पण स्वतः शैव असूनही त्यांची वैष्णव शाक्त अथवा अन्य कोणत्याही संप्रदायाबद्दल अनुदार वृत्ती नव्हती आणि म्हणूनच सर्व उपास्य देवदैवतांची गौरवपर गीते त्यांच्या ग्रंथात आढळतात. तथापि त्यांच्या चरित्रातील खालील आख्यायिका त्यांच्या शिवभक्तीच्या कळसावर प्रकाशझोत टाकणारी आहे.

एके दिवशी विद्यापती आपल्या उदना नामक नोकरासह कुठल्याशा गावी जात होते. घनदाट जंगलातून त्या दोघांची पदयात्रा सुरू होती. बरेच अंतर चालून गेल्यावर विद्यापतीना तहान लागली. पण सभोवार जवळ पास कुठे पाणी मिळण्याचे लक्षण दिसेना. अखेर तहानेने व्याकूळ होऊन त्यांनी नोकराला कुठे पाणी मिळत असल्यास घेऊन येण्याबद्दल सांगितले, आणि काही क्षणाच्या आतच तो नोकर आपल्या स्वामीसाठी

थंडगार पाणी घेऊन आला. प्रत्यक्ष गंगाजलाची चव असलेले ते पाणी कोठून आणले म्हणून त्यांनी नोकराला विचारले. नोकराने आपण स्वत: शिव म्हणजे महादेव असल्याचे व विद्यापतींच्या शिवभक्तिवर भाळून नोकर रूपात नेहमी त्यांच्या जवळ राहात असल्याचे सांगितले. आपली तृषार्त अवस्था पाहून प्रत्यक्ष शिवाने आपल्या जटेतील गंगेचे पाणी आपणास प्यायला दिले हे पाहून तर विद्यापतींच्या कृतज्ञतेला गहिवर आला. पण पुढे शंभु महादेवाने त्यांना हेही सांगितले की या घटनेची तू वाच्यता करीत नाहीस तो वरच मी सेवक म्हणून तुझ्या सोवत राहाणार आहे.

या घटनेनंतर विद्यापतींनी उदनाकडून कष्टाची कामे घेणे बंद केले व या घटनेची कुठेही वाच्यता न होऊ देण्याची ते खूप काळजी घेऊ लागले.

पण एके दिवशी उदनाकडून काही कामामध्ये दिरंगाई झाल्यामुळे विद्यापतींच्या पत्नीचे पित्त खवळले व त्याला मारण्या पर्यंत तिची मजल गेली. अर्थातच विद्यापतींना सात्विक संताप आला व ते तिला म्हणाले, "चांडाळणी, माझ्या शिवाला तू मारलेस?" आणि या गौप्य स्फोटामुळे श्रीशिवशंभू भगवान अंतर्धान झाले ते कायमचेच !

**अदृश्य वस्तु ओळखण्याचा चमत्कार:**

मिथिलाचे महाराज शिवसिंह व राणी लखिमा या दोघांचेही विद्यापतींवर भारी प्रेम– तसेच विद्यापतींनीही महाराज शिवसिंहाबद्दल अनेक गौरव गीते लिहिली होती. याच महाराजानीं आपल्या राज्याभिषेकाचे वेळी विद्यापतींना गढ बिसपी हे गाव इनाम म्हणून दिले होते.

एकदा एका यवन सुलतानाने शिवसिंह महाराजांना पकडून दिल्लीस नेले. त्यामुळे महाराजांच्या कुटूंबीयात खूपच अस्वस्थता निर्माण झाली होती. ही गोष्ट विद्यापतींच्या मनाला फार लागली व आपल्या महाराजांना सोडवून आणण्याची प्रतिज्ञा करून ते दिल्लीस गेले व त्या सुलतानास सांगितले की मी प्रत्यक्ष डोळयांनी न पाहिलेली वस्तु अचूक वर्णन करून सांगू शकतो. लगेच विद्यापतींना एका लाकडी पेटींत बंद करण्यात आले व व दोरखंडाच्या सहाय्याने ती पेटी विहिरींत मध्यापर्यंत सोडण्यात आली.

सुलतानाने विहिरीच्या बांधावर विस्तव फुंकणारी एक सुंदर स्त्री उभी केली व विहिरीच्या वरच्या भागावर काय काय घडत आहे अशी पृच्छा केली. तो काय चमत्कार ? त्या बंद पेटीतून विद्यापतींनी विस्तव फुंकणाऱ्या सुंदर स्त्रीचे वर्णन असलेले खालील सुमधुर गीत गायला सुरुवात केली.

**"सजनि निहुरि फुकु आणि । तोहर कमलभ मर मोर देखल। मदन ऊठल जागि। जो तौहें भामिनि भवन जएबह । एवह कोनह बेला । जो ए संकट सौं जी बाँचत । होयत लोचन मेला ।"**

तो चमत्कार आणि विद्यापतींची हुकमी प्रतिभा व शीघ्र कवित्व ऐकून सुलतान बेहद्द खूष झाला व त्याने विद्यापतींना शतावधानी पदवी देऊन त्यांच्या विनंती वर

हुकूम महाराज शिवसिंहाची सुटका केली. धन्य तो राजनिष्ठ शीघ्रकवि व धन्य ते महाराज शिवसिंह ज्यांच्या पदरी विद्यापतीसारखे प्रतिभावंत रत्न होते! वरील आख्यायिकेतील विद्यापतींची तीव्र निरीक्षण शक्ती, कुशाग्र बुध्दी व श्रेष्ठ प्रतिभा या गुणांबद्दल कुणात मतभेद होतील असे वाटत नाही.

**सत्संग व तत्वज्ञान :**

मिथिलास्थित हरिमिश्र नावाचे प्रकांड पंडित विद्यापतींचे गुरु होते. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण हरिमिश्रांच्याच सान्निध्यात झाले. त्यावेळच्या प्रसिध्द वैयाकरणी जयदेव मिश्रांचाही सहवास विद्यापतींना लाभला होता.

प्रेम ही एक सर्वश्रेष्ठ भावना असून त्या माध्यमातूनच जीव–शिवाचे मीलन होऊ शकते हे एक सूत्र त्यांच्या राधा–कृष्ण प्रेम प्रकारांच्या अभिव्यक्तीत अनुस्यूत आहे.

**ग्रंथसंपदा :**

विद्यापतींनी सुरुवातीला संस्कृतात धार्मिक आणि नीतिविषयक ग्रंथ रचना केली. व पुढे जनरुचि लक्षात घेऊन त्यांनी आपल्या मातृभाषेतही काव्य रचना केली.

त्यांच्या साहित्याचे स्थूल वर्गीकरण करायचे झाल्याच संस्कृत, अपभ्रंश (हिंदी) व मैथिली अशा त्रिविध भाषेत लिहिलेली ग्रंथसंपदा असे करता येईल.

भूपरिक्रमा, पुरुष–परीक्षा, गयापत्तल, लिखनावली, विभागसार, वर्णक्रिया, शैवसर्वस्वसार, प्रमाणभूतपुराण संग्रह, गंगावाक्यावली, दानवाक्यावली, दुर्गाभक्ति-तरंगिणी आदि ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. कीर्तिलता, कीर्तिपताका हे ग्रंथ आणि काही फुटकळ गेय गीते अपभ्रंश (हिंदी) भाषेत आहेत. तर 'पदावली' तील बहुतेक पदे मातृभाषेत (मैथिली) लिहिलेली आढळतात.

"कीर्तिलता" हा ग्रंथ विद्यापतींचा पहिला ग्रंथ मानण्यात येतो. त्यांनी आपल्या वयाच्या २० व्या वर्षी हा ग्रंथ लिहिला. यात महाराज कीर्तिसिंहाची शौर्यगाथा, दानशूरता आणि राजकारणनिपुणता यांचे सुरस वर्णन आहे. तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारा ग्रंथ म्हणून याची विशेष प्रसिद्धी आहे.

**संगीताची जाण :**

विद्यापतींना संगीताची चांगलीच जाण होती म्हणूनच त्यांच्या बहुतेक सर्व गीतांमध्ये माधुर्य आणि गेयता आढळते. विद्यापतींच्या या काव्यविशेषावर बेहद्द खूष होऊनच महाराज शिवसिंहांनी त्यांची पदे स्वरबद्ध करण्यासाठी सुमती नामक कायस्थ कथ्थक कलावंत संगीतज्ञाची नेमणूक केली होती.

**गौरवपर पदव्या :**

विद्यापतींच्या भावाभिव्यक्तीतील सूक्ष्मता, हिंदीच्या कोणत्याच समकालीन कवि – भक्त कवीत एवढ्या प्रकर्षाने न आढळून येणारा भाव तथा भाषा माधुर्य

यांचा परमोत्कर्ष, राधाकृष्ण लीलावर्णनात आढळून येणारा शुध्द उत्तुंग भक्तिभाव आदि गुणामुळे विद्यापति शृंगारिक कवि होते की आध्यात्मिक भक्तिरसाचा परिपोष करणारे संतकवि होते याविषयी जाणकारात बरेच उलट सुलट मतभेद असले तरी त्यांच्या हयातीत त्यांना अनेक गौरवपर पदव्या मिळाल्या होत्या त्यातील अभिनव जयदेव, सुकविकंठहार, शतावधान, कवि-रतन, सुकवी, सरस कवि, कविरंजन, मैथिल-कोकिल आदि सर्व परिचित आहेत.

प्रत्यक्ष भगवान चैतन्य प्रभु विद्यापतींची पदावलीतील अनेक भजने अतिशय तल्लीनतेने गात असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. या संदर्भात भाषा-साहित्य प्रभु डॉक्टर ग्रियर्सन यांचेही

"Even when the Sun of Hindu religion is set, when belief and faith in Krishna and in that medicine of 'disease of existence' the hymns of Krishnas Love is extinct, Still the Love borne in Songs of Vidyapati in which he tells of Krishna and Radha will never diminish." हे मत खूपच बोलके आहे.

**"मरणं जान्हवी तीरे"**

आपल्या 'गंगावाक्यावली"तून मोठ्या श्रद्धेने व भाविकतेने गंगास्नानाचे माहात्म्य, गंगातीरी केलेल्या दानाचे पुण्य आदि गंगागौरव गाणाऱ्या शिवभक्त विद्यापतींच्या जीवनाची इतिश्री कुणालाही हेवा वाटावा अशीच झाली. विद्यापती आपल्या आयुष्याच्या अखेरीस खूपच विरक्त झाले होते. श्रीशिवस्तोत्रे व श्रीकृष्णकीर्तनाची पदे गात ते कालक्रमणा करू लागले.

आयुष्याच्या अखेरच्या घटका मोजित असताना व आपला अंतकाळ समीप दिसत असताना मिथिला देशातील लोकाचारानुसार आपल्यालाही "मरणं जान्हवी तीरे" यावे असा त्यानी ध्यास घेतला व पालखीत बसून गंगेच्या सिमिरिया घाटावर गंगार्पणासाठी निघाले. त्यांची पालखी बरौनी गावापर्यंत आली. बरौनी पासून गंगा दोन कोस दूर होती तेव्हा त्यांनी आपली पालखी तेथेच थांबवावयास सांगितली. ते मनात म्हणाले गंगेचा शोध घेत मी इतक्या दूरवर आलो. आता मला न्यायला काय गंगा दोन कोसही इथवर येऊ शकत नाही? विद्यापतींची इच्छाशक्ति म्हणा किंवा त्यांची अपरंपार शिवभक्ति म्हणा, त्याचरात्री गंगेला पूर आला व प्रवाहाचे पाणी विद्यापतींच्या मुक्कामापर्यंत येऊन वाहू लागले. दुसऱ्या दिवशी म्हणजे विक्रम संवत १४९७ ला वयाच्या ९० व्या वर्षी कार्तिक शुद्ध त्रयोदशीच्या प्रातःसमयी शिवगौरवगीत गात गातच विद्यापतींनी देह गंगार्पण करून आपल्या आयुष्याची अखेर साधली.

* * *

# साईगीतमाला

गीत ६ वे

(श्रीसाईबाबा विहिरीवर स्नान करीत असता, आपल्या शरीराची आंतडी त्यांनी दूर केली, आणि धूवून पुसून स्वच्छ केली हे चित्र त्यांच्या एका भक्ताने पाहिले त्याला वाटले साईबाबा कालवश झाले तो घाबरला परंतु मशिदीत त्यांना पुन्हा धूनी जवळ बसलेले ते दिसले त्यांची कथा तो सांगत आहे.)

करुन आतडे उलटे अपुले साई स्नान करिती,
अहो हे अद्‌भूत आहे किती ॥ध्रु॥

मध्यान्हीच्या त्या एकान्ती,
जिकडे तिकडे असता शांती,
सहज पाहिली करित भ्रमंती
विहिरीवरती उभी ठाकली रम्य दत्तमूर्ती ॥१॥

फुलाप्रमाणे देह उकलुनी
हात पाय ही विखंड करुनी
स्वच्छ आतडी धुउनी पुसुनी
वृक्षावरती वाळत टाकुनि आकाशीं बघती ॥२॥

अलग अलग ते अवयव दिसती,
जागोजागी साई बघती,
अपूर्व ते तर चित्र सभोंतीं
मला कळेना काय बघे मी स्वप्नीं का जागृती ॥३॥

छिन्न भिन्नता तेथे बघता,
भीति वाटली माझ्या चित्ता
वियोग कां हा योगाकरितां ?
साई—मृत्युचा प्रश्न सुटेना या डोळयापुढती ॥४॥

मशिदीजवळी येता येता
धुनी समोरी साई बघता,
लोटांगणि मी त्यांच्या पडता
अगम्य त्यांची कळली मजला साई योग—स्थिती
अहो हे अद्‌भुत आहे किती !

—मधुकर जोशी (डोंबिवली)

# श्रीसाईनाथ

सौ. सुशीलाबाई हजारे

भूवरी आले साईनाथ
उघडली भक्तीची पेठ
या भूमीचे पुण्य अगणित
झाले शिरडी गांव क्षेत्र
भूवरी आले साईनाथ ।।१।।

निंब तरुतळीं प्रगट जाहली
श्रीसाईची मूर्ति सावळी
रूप मनोहर तेज आगळे
पाहुनि जन झाले विस्मित
भूवरी आले साईनाथ ।।२।।

मशिदीमध्ये अखंड वसती
धुनी सन्मुख सदैव वसती
ध्यान मग्न हे अखंड वदती
अल्ला मालिक एकच बात
भूवरी आले साईनाथ ।।३।।

या देवाची अघटित करणी
पणत्यामध्ये ओतुनी पाणी
तेलावाचुनि दिवे जाळिले
मशिदीत सारी रात
भूवरी आले साईनाथ ।।४।।

भक्त भोवती श्रीसाईच्या
नित्य सोहळा भाव भक्तिचा
दरबार खुला शिरडीश्वराचा
कृपा दृष्टिची सर्वां साथ
भूवरी आले साईनाथ ।।५।।

* * *

# —साईगुणगान—

अरुण शहाणे.

दत्तगुरु साक्षात्
साई दत्तगुरु साक्षात् ॥धृ॥

देखुनि मूर्ति प्रसन्न हंसरी
सुंदर तैशी संगमरवरी
वेधुनि घेई चित्त बावरी
महायोगी साक्षात् ॥१॥

मूर्ति पाहता नेत्र पाझरे
बहुजन्मार्जित पाप ओसरे
दर्प—अहंता समूळ विरे
समदर्शी साक्षात ॥२॥

तव महिमा मी कैसा वर्णू
चरित्र जैसें अथांग अर्णवू
ध्यानीं मनीं तुज सदा आठवू
सर्व व्यापी साक्षात् ॥३॥

उदी ती भासे रक्षा केवळ
यम ही साक्षात् कापे चळचळ
नष्ट होतसे व्याधी सकळ
पूर्ण ब्रह्म साक्षात् ॥४॥

साईनाम ते सदैव ध्यावे
साई भजनीं सदा रमावें
मनःशांति मज अमूप पावे
कृपावंत साक्षात् ॥५॥

# रामगीतांजली

लंकेत घनघोर युध्द होऊन त्यात रावणाचा मृत्यु होतो. वानरसेने समक्ष सीता रामासमोर येते. रामाच्या मनात त्यावेळी फार कालवाकालव होते. ते तिला उद्देशून म्हणतात.

या दिसाची वाट होती दो जिवांनीं पाहिली
मुक्त आता मैथिली तू! मुक्त आता मैथिली! ॥धृ॥
धन्य सेवा वानरांची जाहली
दैत्य सेना शर्थ करुनी मारिली
पाप कर्मे रावणाची फेडिली
संपली तव बंधनाची तिमिर रात्री संपली ॥१॥
त्रस्त झाली धर्मनाशें ही धरा
राक्षसांनी भ्रष्ट केले अंबरा
दास केले रावणें अखिलां सुरां
दुष्ट शक्ती आज धर्मे जिंकुनिया नाशिली ॥२॥
डाग जो कीर्तीस माझ्या लागला
पौरुषाने आज आहे क्षाळिला
न्याय फिरुनी तुज निमित्ते स्थापिला
राहि अथवा जाइ जेथें वृत्ति तव गे! रंगली ॥३॥
जी सुखानें जनकगेहीं वाढली
भाग्य म्हणुनी सोबतीला राहिली
मूर्ति माझ्या स्फूर्तिची जी पूजिली
ती प्रिया लोकापवादें पारखी मज जाहली ॥४॥
दूषिता नारी सदा जी परवशा
स्त्रैण म्हणुनी साहणें कां किल्मिषा?
मोकळ्या तुज जानकी दाही दिशा
स्वीकृती भार्या म्हणोनी योग्य तुज ना राहिली ॥५॥

—दिवाकर घैसास—(डोंबिवली पूर्व)

# स्वप्नातच मी आज पाहिले

स्वप्नातच मी आज पाहिले
विनम्रभावे पूजन केले
हृदयी माझ्या नित्य विराजे
तीच तुझी पाउले – विठ्ठला ॥धृ॥

बालरूप वटपर्णी शयनी
क्षीरसागरीं होते रमुनी
जग उद्धरिले ज्या चरणानी
ती गोजिरी पाउले – विठ्ठला ॥१॥

भीमरथीच्या पुण्य तटावर
पुंडलिकास्तव ठेवुनि कटि कर
युगे युगे राहिले विटेवर
पंढरपुर नटविले – विठ्ठला ॥२॥

विठू नाचला संत संगती
एक तारिच्या तालावरती
दृश्य माझिया नयनावरती
रंगूनिया राहिले –– विठ्ठला ॥३॥

प्रेमाश्रूनी स्नान घातले
भक्ति पुष्प मी तुला वाहिले
अनन्यभावे शिर हे तुझिया
समचरणी ठेविले – विठ्ठला ॥४॥

––नारायण चिपळूणकर

## "जय जय साई भगवंता"

जय जय साई भगवंता —॥ध्रु०॥
होई तू आम्हा कृपावंता
भवसंकटी तारी अनंता
देई देई रे दर्शन भक्ता
तूचि अमुचा ज्ञाता त्राता — ॥१॥
तुचि आमुचा रक्षण कर्ता
भक्त जनां आधार नाथा
अंधारी ह्या नाथ अनाथा
नेई आम्हा संत् पंथा — ॥२॥
कलियुगीं देव विसरलो
स्वार्थ संगरी पूर्ण गुंतलो
सत् धर्माहून दूर राहिलो
पूर्णानंदा पुरा हरपलो — ॥३॥
रूप सावळे घननीळाचे
पूर्ण स्वरुपी प्रभु रामाचे
रुद्र रूप रे सांब शिवाचे
सर्व साक्षी तू रूप तयांचे ॥४॥

महादेव साने कराड

## एकरूपता

मेघों से जल बूंदें गिरती
भूपर सरिता से आ मिलती।
सरिता उन बूंदों को लेकर,
सागर से मिलने को जाती॥
जीवात्माओं की बूंदों को,
यमराज बहा यों ले जाता।
परमात्माओंके सागर से,
मिल, मुक्तिधाम को पहुँचाता॥
जलबूंदें मिलती सागर से
मिलकर "एकरूप" हो जातीं।
वैसे ही जीवात्माएं भी,
विलीन परमात्मामें होती॥

राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'

# छंद बावरी

सौ. सुशीलाबाई हजारे.

छंद बावरी मी। प्रभु मी छंद बावरी ॥धृ॥
छंद माझा प्रभू राया रे। नित्य असावे तुझ्या मंदिरीं॥

हातीं घेउनी एकतारी। वदावे साई कृष्ण हरी
जयजय राम कृष्ण हरी॥ छंद बावरी मी छंद बावरी ॥१॥

अखंड असावे तुझ्या राउळी। रंगुनी जावे भजन कीर्तनी
टाळ-विण्याच्या झंकारासह। धुंद होऊनी जयजयकारी ॥२॥
छंद बावरी मी छंद बावरी

सन्निध असावें तुझ्या श्रीहरी। हाती घेउनी नामस्मरणी
मिटल्या नयना पुढती दिसावी॥ मूर्ती तुझी साजिरी
छंद बावरी मी छंद बावरी ॥३॥

# "वाट अखेरची"

वाट अखेरची सर्वांची एकच एक।
नोंद दिवस जन्म मृत्यूची नेमकीच ॥१॥
जगाच्या जीवनांत दैनंदिन व्यवहारात।
आलेली कामगिरी वाट्यास लावून ॥२॥
क्षुल्लक कामगिरी आणि अनेक गूढ कार्यात।
अहर्निश जीव खपलो जीवन कक्षेत ॥३॥
सार्थक समाधान आनंद ह्या साठी धडपड।
बुद्धी चातुर्य क्षण मोलाचे, सुसंगतीत ॥४॥
यश निश्चितीचे नसे मानवा हाती खास।
पालन कर्तव्याचे करणे हीच ठेवणे आस ॥५॥
फळे चांगल्याची, चांगलीच येतील वाट्यास।
विश्वास हाच धरिता, समाधान चित्तास ॥६॥
समाधान ही चीज, काही आगळीच जगतात।
सुसंबद्ध संगतवार साखळी नेमकीच ॥७॥
मृत्यू येणे समाधानात ही एक ईश्वरी कृपाच।
शेवटच्या क्षणीच पुण्याई हवी जीवातेंच ॥८॥

चित्रकार — स. कृ. काळे

# साईखेड्याचे श्री दादाजी धूनीवाले

लेखक:- श्री. ना. हुद्दार

जेथे बुद्धीचा मार्ग खुंटतो तेथे श्रद्धेचा भाव जागृत होतो असा एक सिद्धांत आहे. अण्वस्त्रे, प्रक्षेपणास्त्रे नभोमंडळातील ग्रह व तान्यांच्या वर उड्डाण करून जाण्याचे प्रयत्न विज्ञान शास्त्राच्या बलावर आज मानव करीत आहे. तरी पण वर्षानुवर्ष प्रयत्न करून आणि यासाठी अब्जावधी रुपये खर्च करून जे ज्ञान प्राप्त झाले ते पानशेत धरण प्रकरण, विमानादींचे वेळोवेळी होणारे अपघात, भूकंपासारखे उत्पात व अन्य निसर्ग प्रकोपामुळे जी जीव व वित्ताची भीषण हानी होते ती पाहता सृष्टिचालक शक्ती म्हणजे ईश्वराच्या अघटित-घटनापटुत्वाच्या शक्तीच्या तुलनेत मानव किती पंगु आहे व त्याची वैज्ञानिक प्रगति किती अत्यल्प आहे याचा प्रत्यय येतो. तेव्हा पुरुषार्थ साधण्याचा प्रयत्न करीत असतानाच मानवाने ईश्वरी सत्तेपुढे विनम्र भावाने नमावयास हवे.

अशा प्रकारची शिकवण सन्त व महात्मे देत असतात. सर्व धर्मांत व देशात असे संत महात्मे वेळोवेळी झालेले आहेत. भारतवर्षांत ऋषी-मुनी व साधु संत लोकांची परंपरा हजारो वर्षांपासून अखंड चालू असून आजच्या विज्ञान-युगातहि असे महापुरुष जागोजागी राहात असून ते रंजले-गांजलेल्यांची सेवा करून त्यांच्या-मध्ये ईश्वरभक्ति व सदाचाराची जाणीव निर्माण करतात. साईखेड्याचे श्रीदादाजी धुनीवाले हे एक असेच महान् सन्त नर्मदा तटाक यात्रा करणाऱ्या 'जमात वाले बाबा' सांप्रदायात होऊन गेले आहेत.

## धूनीवाले दादाजींचे पूर्ववृत्त

मोंघीर (बिहार) जिल्ह्यात पं. शिवबालक हे एक सारस्वत ब्राह्मण राहात असून त्यांच्या पत्नीचे नाव विद्यावतीदेवी होते. त्यांना रामसेवक नावाचा पुत्र झाला. त्यांच्या वयाच्या ५ व्या वर्षी त्याच्या मातेचे निधन झाले. 'आई कुठे आहे?' या त्याच्या प्रश्नास 'आई देवाघरी गेली' असे लोक उत्तर देत. हे ऐकून रामसेवकाने ७ व्या वर्षी आईच्या शोधार्थ गृहत्याग केला व तो फिरत फिरत नर्मदातटाकावर ग्वारी घाट येथे (जबलपुर जवळ) आला. या ठिकाणी जमातवाले बाबा स्वामी गौरीशंकर साधु महाराज हे आपल्या साधु अनुयायासह चातुर्मास करीत होते. गौरीशंकर महाराजांचे या तेजस्वी बालकाकडे लक्ष जाताच त्यांनी त्याला प्रेमाने मांडीवर घेऊन त्याला त्याचे नाव विचारले, रामसेवक आश्चर्याने साधुलोकांकडे

पाहात राहिला. त्याच्या तोंडून शब्द निघेना. तेव्हां नर्मदा मातेच्या कृपेने हा मुलगा प्राप्त झाला आहे याला 'माधव' नावाने संबोधावे असें गौरीशंकर स्वामींनी सांगितले. आपल्या नम्र व गोड वागणुकीने त्याने सर्व साधूंचे प्रेम संपादन केले होते.

### नर्मदा तटाक यात्रा करणारी साधूंची जमात

भारतीय संस्कृतीच्या सर्व विचार धारांचे आदिस्रोत 'वेद' असून आस्तिक व नास्तिकही वेद-श्रुतीना मानतात. वेदान्तकर्म उपासना व ज्ञान हे तीन मार्ग आत्मोन्नतीसाठी सांगितले आहेत. ज्ञानमार्गात विश्वाचे मूलतत्त्व म्हणजेच वेदान्ताचे ज्ञान करून घेण्याचा उद्देश असतो. विभिन्न ज्ञानी लोकांनी आपल्या बुद्धीनुसार वेदान्त चर्चा करून विभिन्न सांप्रदाय जरी निर्माण केले असले तरी सर्वांना आधार–भूत वेद हेच आहेत. या अद्वैताचा प्रचार प्राचीन काली वसिष्ठ, पाराशर, व्यास, शुक्राचार्य आदीनीं केला. शुक्राचार्यांचे शिष्य गौडपादाचार्य असून ते श्रीमत् आद्यशंकराचार्यांचे गुरू श्रीगोविंदभगवदाचार्य ऊर्फ गोविंद स्वामी यांचे गुरू होते. श्रीगोविंद स्वामी नर्मदातटाकावरील ओंकारेश्वर येथें राहात असत. येथें कोटितीर्थावर जीर्ण गोविंदेश्वराचे मंदिर आहे.

सुमारे १५०० वर्षांपूर्वी केरळ प्रांतात कालडी गावी पं. शिवगुरू व सती सुभद्रादेवी या सत्वशील दांपत्याच्या पोटी 'शंकर' पुत्र रूपाने अवतीर्ण झाले. ८ व्या वर्षी या शंकराने भवभय तापहरिणी नर्मदातीरी रमणाऱ्या श्रीगोविंद स्वामींच्या चरणाजवळ ओंकारेश्वर येथे कोटितीर्थावर संन्यास दीक्षा घेतली. काही काळ साधना करून त्यानी उच्च कोटीचे योगसिध्दी महात्मा पद प्राप्त केले. नंतर श्री. गुरूंच्या आदेशाने वेदांतसूत्रावर भाष्य लिहिण्यास आरंभ केला. ज्या स्थानी हा "श्री गणेशा" झाला. ते ओंकारेश्वरातील स्थान 'पशुपती' नावाने प्रसिद्ध आहे. हे भाष्य काशिक्षेत्री-जाऊन त्यांनी पूर्ण केले. हेच शांकर भाष्य होय.

याच पशूपतिक्षेत्री कालांतराने श्री कमलभारतीजी प्रसिद्धीस आले. त्यांनी रेवा (नर्मदा) खंडात अखंड भ्रमण करून श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत वेदांताचा प्रचार केला व त्याबरोबरच समन्वय दृष्टिकोनातून कर्म व भक्ति मार्गाचा प्रचार केला. नर्मदा तटाकयात्रेवरही त्यांनी विशेष भर दिला. त्यांचे जवळ अनेक साधूंचा जमाव असे. यावरुन त्यांच्या समुदायाला 'जमात' व त्यांना 'जमातवाले बाबा' हे नाव पडले.

श्रीशंकराचार्यांचे हिमालय क्षेत्रातील 'ज्योतिर्मठाच्या श्रीशंकराचार्यांच्या आदेशावरून श्री गौरीशंकर महाराज रेवा खंडात अद्वैताचा प्रभावी प्रचार करण्यासाठी आले. दक्षिणेत रेवातीरी येऊन ते कमलभारतीच्या जमातीत समाविष्ट झाले. त्यानंतर लौकरच श्रीकमलाभारतीनी पशुपति स्थानी सचेत जलसमाधी घेतली व श्रीगौरी शंकरजी या जमातीचे प्रमुख झाले.

श्रीगौरीशंकराच्या काली १८५७ च्या धामधुमीत या जमातीवर गोळ्या झाडण्याचा गोऱ्या सोल्जरांनी प्रयत्न केला पण त्यांच्या आध्यात्मिक प्रभावामुळे सोल्जरांना नमावे लागले. या जमातीला 'हिन्दुओंके लाल पाद्री' म्हणत.

## माधवाचा व्रतबंध व वेदाध्ययन

योग्यवेळी माधवांचा व्रत बंध करून श्रीगौरी शंकरांनी त्याला वेदाध्ययनार्थ काशीला पाठविले. आपल्या असाधारण बुध्दिमत्तेमुळे त्याने अध्ययन करून 'आचार्य' पदवी घेतली व परत गौरीशंकर महाराजांकडे येऊन त्यांच्या चरणावर नम्रतेने 'आचार्य' चे प्रमाणपत्र ठेविले. गौरीशंकरमहाराजांना त्याच्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले. त्यांनी त्याला 'रेवानंद' तथा ब्रह्मानंद' या प्रमुख महात्म्याच्या स्वाधीन करून हठयोग शिकवायला आरंभ करण्यास सांगितले. थोडयाच अवधीत हठयोगाच्या अंग प्रत्यंगाचा अभ्यास केल्यावर त्याचे कडे जमातीचे भंडारीचे काम सोपविले. लवकरच जमातीची दीक्षा दिली जाऊन त्याचे नाव कृष्णानंद ठेवण्यात आले. नंतर गुरूच्या आदेशावरून ते हिमालयावर साधना व यात्रा करण्यासाठी गेले, व काही वर्षांनी परत जमातीस येऊन मिळाले.

## दिनचर्या

रोज पहाटे ब्राह्म मुहुर्तावर उठून व नर्मदा स्नान करून संध्या, व्यायाम, प्राणायाम करावयाचा व नंतर अग्नि व गुरु देवांना वंदन करून ग्रंथाध्ययन करावयाचे. मध्यान्ही पुन्हा नर्मदा स्नान व कर्म केल्यावर सर्वांसह भोजन करावयाचे. संध्याकाळी पुनः स्नानादि कर्म व फलाहार केल्यावर गुरुदेवासह ज्ञानचर्या करावयाची. नंतर गुरु-सेवा करून गुरुदेव झोपल्यावर ते थोडी निद्रा घेत .व्यायामासाठी ते १००० पर्यंत दंड बैठका काढीत . योग बलाने एकदा जमिनी पासून १० हात उंचावर त्यांचे शरीर गेले असल्याचे पहाण्यात आले होते.

सर्व जण झोपल्यावर काही वेळाने कृष्णानंद हळूच उठून नर्मदा तीरावर जाऊन उच्च स्वरात वेदमंत्र व ऋचा म्हणत व ध्यान करीत. पहाटे प्रत्येक साधूच्या उशाशी गरम हलव्याचा द्रोण ठेवीत व नंतर गुरुदेवांजवळ जाऊन झोपत. अर्ध्या प्रहरांने पहाट होताच उठत. असे ३—४ दिवस झाल्यावर काही साधूनी पाळत ठेवून पाहिले की रोज कोण उशाशी हलव्याचे द्रोण ठेवतो. कृष्णानंदाकडून हे घडून येत असल्याचे कळल्यावरून गौरीशंकर महाराजांनी त्यांस बोलावून सांगितले कीं, याप्रमाणे भंडाऱ्यातील हवनाच्या तुपासाखरेचा खर्च करणें बरे नव्हे. कृष्णानंदानी नम्रपणे सांगितले की "भंडाऱ्यातील हवनाच्या साहित्याचा मी उपयोग केलेला नाही. "नर्मदा मातेकडून मला हे साहित्य मिळत होते. " हे ऐकून गौरीशंकर महाराजांना फार विस्मय वाटून त्यांचे डोळे प्रेमाश्रूनीं भरुन आले. व त्यांनी त्याला प्रेमालिंगन दिले.

### एकान्तवास

कृष्णानंदाची एकान्तवास करण्याकडे प्रवृत्ती होवू लागली. मध्येच ते जंगलात निघून जात. इतर साधू शोध करून त्याला परत आणीत. एकदा दूर रानात जाऊन एका मोठया पिंपळाच्या पोकळीत समाधी लावून बसले. बरेच दिवस त्यांचा पत्ता लागला नाही. एके दिवशी त्यांना समाधीच्या स्थितीत जमातीच्या साधूनी पाहिले. त्यांनी भजन स्तवन सूरू केले. कांही वेळाने समाधी उतरल्यावर त्यांना साधूनी श्री. गौरीशंकर महाराजांकडे जवळ आणले, हळूहळू गुरुदेवांनी जमातीचे महंत पद कृष्णानंदावर सोपविले व इतर ब्रह्मानंद, नर्मदानंद आदींना त्यांना सहाय्य करण्यास सांगितले.

इ. स. १८८८ चा जमातीचा दुर्गोत्सव हुशंगाबाद येथे मोठया धामधूमीने सुरू झाला. गौरीशंकर महाराजांनी कृष्णानंदाना जवळ बोलावून सांगितले, "आम्ही आता सचेत समाधी घेणार" ही वार्ता वायुवेगाने पसरून असंख्य लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले, मार्गशीर्ष शुक्ल ९ दिनी १३–१४ मैलावरील कोकसर गावी नर्मदेचे पात्र विशाल आहे. तेथे गौरीशंकरांनी सचेत जलसमाधी घेतली. तेथेच त्यांची समाधि बांधण्यात आली असून ते एक मोठे यात्रेचे स्थान बनले आहे. आता कृष्णानंद तथा दादाजी हेच जमातीचे प्रमुख झाले. त्यांचे बरोबर श्रीकेशवानंद ऊर्फ बडे भैय्या नावाचे संन्यासी रहात असत. त्यांचे कडून दादाजी महाराजांसंबंधीची माहिती घेऊन नागपूरच्या श्रीकेशवानंद आश्रमाचे संस्थापक श्रीशंकरानंदानी 'दादा-चरित सागर' या ग्रंथ रूपाने प्रकाशित केली आहे.

### ग्रंथ लेखन

श्रीकृष्णानंदाचे यजुर्वेद सामवेद आदि ग्रंथांचे चांगले अध्ययन झाले होते. त्यांनी काही ग्रंथ लिहिले असून स्तोत्रेंही केली आहेत. परंतु दुर्दैवाने त्यांचे लिखाण आज उपलब्ध नाही. श्रीयंत्र बनवून दु'र्गासप्तशती' हा संस्कृत ग्रंथही त्यांनी सुंदर हस्ताक्षरात लिहिलेला बडेभैय्यानी शंकरानंदांना दाखविला. हा ग्रंथ त्यांनी आपल्या पूजास्थानी ठेविला होता. १९४६ मध्ये बडेभैय्या काशीला गेले व तेथेच त्यांचा अंत झाला. यामुळे आता हा अमोल ग्रंथही दुष्प्राप्य झाला आहे.

कृष्णानंद तथा दादाजी नित्य रात्री जेव्हा ध्यानास बसत तेव्हा त्यांच्या दोन बाजूस दोन वाघ येऊन बसत हे पाहून जमातीच्या साधूंना भीति वाटली व ते ओरडू लागले. तेव्हा कृष्णानंदानी त्यांना सांगितले की "आत्मा हा मनुष्य व पशु यांत सारखाच असतो तेव्हा त्याची भीति कशाला ? "

कृष्णानंद अवधूत वृत्तीचे असून त्यांनी परमहंस पद प्राप्त केले होते. 'बालोन्मत्त-पिशाच्चवत्' अशी त्यांची स्थिति होती. दंड, कमडंलु, कटिसूत्र, वस्त्र - कशाचीच त्यांना गरज नसे, लौकिक व वैदिक कर्मातूनहि ते मुक्त झाले होते. केव्हाही उठून ते दाट जंगलात एकांत वासासाठी निघून जात. जमातीचे प्रमुख असूनही त्यांची ही वृत्ती कायम होती. एकदा ते खांडव वनात पिंपळाच्या पोकळींत समाधि लावून बसले. जमातीच्या साधूंनी त्यांचा पुष्कळ शोध केला. अशा प्रकारे अनेक दिवस

समाधि स्थितित असता त्या पिंपळाजवळ एक अजगर आला व त्याने त्यांना पायापासून गिळण्यास आरंभ केला. त्या मार्गाने जाणाऱ्या एका गवळणीने हे दृश्य पहाताच ती भ्याली व तिने आरडा ओरडा करून शेजारच्या गावातील लोकाना जमविले. त्यांनी लाठ्या व कुऱ्हाडीने अजगराचे तुकडे केले. या कोलाहलाने कृष्णानंदांची समाधी उतरली. तेव्हा अजगराला मारलेले पाहून त्यांना दु:ख झाले. यावेळी त्यांच्या डाव्या पायाचे अर्धे बोट मात्र गिळले गेले होते. यानंतर फिरत फिरत ते पुन: जमातीत आले. त्यांना परत आलेले पाहून जमात वाल्यांनी मोठा आनंदोत्सव केला.

त्यांना जमातीचे बंधन कसे मानवणार ? त्यांनी नर्मदानंदजीकडे महंतपद देऊन त्यांनी पुन: निर्जन वनाचा मार्ग धरला. नर्मदानंदानी त्यांचे बरोबर शंकरानंदाना पाठविले. पण एक दिवस त्यांचीही दृष्टी चूकवून ते निघून गेले आणि नर्मदा तटावर सिरसिरी संदूक येथे एक पर्णकूटीत राहू लागले. काही कालानंतर निबिड जंगलात सर्प दंशाने मृत झालेले त्यांचे शरीर जमातीच्या साधूनीं पाहिले. नर्मदानंदानी नर्मदा-नदीत ते विसर्जित केले व जमातीने दु:खी स्थितीत तेथून कूच केले.

### कृष्णानंद 'रामफल' म्हणून प्रगट

काही दिवसानी हुशंगाबादच्या नर्मदा तटाकावर एक 'राम फल' नावाचा वेडया प्रमाणे दिसणारा दिगंबर साधू फिरू लागला. लहान मुले त्याच्या भोवती जमू लागली. ते हलवायाच्या दुकानातील मिठई उचलून त्यांना देत वा त्यांनाच दुकानातील मिठाई लुटण्यास सांगत. हलवायाने "आम्हा गरीबांचे नुकसान होते" म्हटले तर सांगत "मुक्कामावर बिल आण व पैसे घेऊन जा" कोकसर मार्गावर एका पुलाखाली ते पडलेले असत. हलवायी बिल घेऊन तेथे गेला की म्हणत "अमुक दगडा खाली बिल ठेव व तेथून पैसे घेवून जा." हलवायाला दगडाखाली नेमकी त्याच्या बिलाइतकी रक्कम मिळे.

रस्त्याने दूध दही विकण्यास नेणाऱ्या बायाकडे ते दूध दही मागत. एक बाई कुचेष्टेने त्यांचे कडे दुर्लक्ष करून जाऊ लागली तर बसल्या जागेवरून हात लांब करून तिच्या डोक्यावरील दूध दह्याचे भांडे त्यांनी खाली काढले १०–१२ हात लांब हात पाहून ती गवळीण भ्याली व पुन: त्या मार्गाने आली नाही.

एकदा सडकेवरील दिव्याखाली एक गरीब विद्यार्थी रात्री अभ्यास करीत असता गस्तवाल्या पोलिसाने त्याला पकडून मारहाण केली. मुलांनी ही हकीगत दादाजीनां सांगितली तेव्हा हातात दंडा घेऊन ते रस्त्यावरील दिवे फोडीत चालले तेव्हा पोलिसांनी त्यांना पकडून हवालतीत बंद करून ठेवले. तरी दादाजीना दंडा घेऊन रस्त्यावरून जाताना त्यांनी पाहिले! चौकीच्या कोठडीत येऊन पाहिले तर तेथेही ते होतेच. पोलिसाना त्यांचे विभूतिमत्व कळून येऊन त्यांनी त्यांना सोडून दिले.

एके दिवशी हुशंगाबाद शहरातील एका मोठया विहिरीच्या काठावर रामफल दादा बसले व आत्मचिंतनात डुलत होते. डुलता डुलता ते विहिरीत पडले. विहिरीतून त्यांना मृतावस्थेत काढण्यात आले. पंचनामा होऊन त्यांचे शव पुरण्यात आले. हुशंगाबादच्या नागरिकांना या घटनेने फार दु:ख झाले.

(अपूर्ण)

# त्यजूनि वस्त्रें नर जेंवि जीर्ण

(गोष्टीरूप गीता)

श्री. वि. के. छत्रे (कल्याण)

एका वाड्यामध्ये दुपारच्या वेळला काही मुले खेळाच्या निमित्ताने जमली होती. परंतु आज खेळात त्यांचे लक्ष लागेना. याचे कारण वाड्यातले वयोवृद्ध भाऊ आज स्वर्गवासी झाले होते. बऱ्याच मुलांच्या मनात त्यांच्या पुढच्या प्रवासाबद्दल कुतूहल उत्पन्न झाले होते. ती खेळ सोडून ओटीवर जमली व एकमेकात चर्चा करू लागली. त्यांच्या मध्ये शाली जरा अधिक धीट चौकस होती. ती गोविंदला म्हणाली 'ए मधाशी भाऊंना कुठ नेले रे ? मला त्यांना पहायची फार इच्छा होती पण आईने आम्हाला खोलीतच खेळण्याची सक्त ताकीद दिल्यामुळे पाहाता आले नाहीं.'

' हो, आम्हाला ही अशीच ताकीद दिली होती ' गोविंदा म्हणाला, तरी मी आंगठयावर उभे राहून खिडकीतून पाहिलेच'.

'अरे, त्यांना किनई स्मशानात नेल हो, जाळण्याकरिता' जरा प्रौढ सुषमा म्हणाली.

' कशावरून ग ?'

'अग मी एकदा किनई – माझ्या नानाबरोबर फिरायला गेले होते. तो वाटेत दूर अंतरावरचा मला मोठा जाळ दिसला. तेव्हा मी त्यांना म्हटले 'नाना, ती पहा केवढी आग लागली आहे !'

तेव्हा ते म्हणाले 'अग, ती आग नाही. मेलेल्या माणसाला तिथे जाळतात.' त्यावर मी आणखी प्रश्न विचारणार तोच समोरून त्यांचा एक मित्र आला व त्यांच्या गप्पा सुरू झाल्या व मग मी ही विसरून गेले.'

'हो ! सुषमाचा तर्क बरोबर आहे.' शाली म्हणाली. 'कारण तुम्ही पुढे वखारीत जाऊन अगोदर लाकडांची व्यवस्था करा, असं कोणाचे तरी बोलणे माझ्या कानावर आले'.

'अय्या ! मग आपण मेल्यावर आपल्याला सुद्धा असच जाळणार की काय ?' धाकट्या अनिलने घाबरून विचारले.

'हो. पण सगळयानाच मेल्यावर जाळतात असं नाही काही. मोठ्या माणसांना जाळतात आणि लहान मुलांना पुरतात. ' शाली म्हणाली.

'काहीतरी थापा देतेस. हिंदु लोकात मेलेल्याना पुरत नाहीत. ' गोविंदा म्हणाला.

'अरे, माझ्या गळयाची शपथ. मी आजोळी गेले होते, तिथे आमच्या शेजारी मी खेळायला म्हणून गेले, तिथे लोक खड्डा खणीत होते. ते पाहून मी घरात येऊन आईला सांगितले तेव्हा तिने मला हे सांगितले' शालीने आपले म्हणणे स्पष्टपणे मांडले.

तेवढयात भाऊंना पोचवून लोक परत येताना दिसले म्हणून सगळी मुले आपापल्या घरात पळाली. संध्याकाळी जेवणखाण झाल्यानंतर शाली वडिलांना म्हणाली 'आता आम्हाला गोष्ट सांगायला कुणी नाही, तर तुम्ही सांगाल का ?'

'हो! हो! सांगेन. कधी मी, कधी तुझी आई.' 'पण काय हो नाना, भाऊ आता कुठे गेले असतील ? शालीने प्रश्न केला.
नाना म्हणाले 'देवाकडे'

'पण काय हो वाईट माणसांना देव नरकात पाठवतो ही गोष्ट खरी का ?'

'हो, अगदी खरी आहे. म्हणून तर माणसानी चांगले वागावे'

'मग असे आपल्याला सगळयाना मरावे लागेल की काय' मला तर बाई भीति वाटते'.

'अग ! त्यात भ्यायचे कारण नाही'

निर्मलाबाई आपले काम आटोपून दारात बाप लेकींचा संवाद ऐकत उभ्या होत्या. त्या पुढे येऊन म्हणाल्या 'चल ग शाले, झोपायला'

'अग, पण मला अजून झोप येत नाही'

'कशाला या भलत्या वेळेला तिला मरणाविषयी गोष्टी सांगता '?
पतिराजांकडे पहात त्या म्हणाल्या, 'रात्री दचकून उठायची !

'हे पहा, एवी–तेवी विषय निघालाच आहे, तर मी तिची समजूत कशी घालतो ते पहा तर खरी' नाना म्हणाले.

'हे पहा झाले, तुझा फ्रॉक फाटला की तुझी आई काय करते ?'

'दुसरा नवीन शिवते' शालीने उत्तर दिले,

'त्याचप्रमाणे आपल्या सगळ्या माणसांची आई म्हणजेच जगदंबा. ज्यांचे शरीर निकामी झाले असे तिला वाटत असेल, त्याचे ती काढून घेऊन त्याला दुसरे नवे शरीर देते.

'म्हणजे मग बाळ जन्माला येते तसेच ना ? शाली म्हणाली.

'हो. बरोबर' नाना म्हणाले.

'पण काही मुले आपले कपडे वाटेल तसे मळवतात, कुठेतरी टाकून देतात, आणि त्यामुळे ते लौकर फाटतात.'

'हो, मला आठवले. आमच्या वर्गातल्या लिलीचा नवा झगा बरेच दिवस सापडत नव्हता. तो परवा सापडला. पण उंदरांनी खाल्लेला ! मग तिची आई तिला रागावली.

'बरोबर आहे' नाना म्हणाले, 'तसाच आपल्या शरीराचा माणसाने चांगला उपयोग करावा. जगदंबेची अशी इच्छा असते.

''आता तर तुझी मरणाची भीति गेली ना?'

'हो ! आता नेहमीच चांगली वागेन'

'चांगले कसे वागावे हेही कळले पाहिजे. म्हणून मी सांगतो ते लक्षात ठेव' नाना म्हणाले 'भाऊ गेले तेव्हा वाईट झाले असे आपण म्हणतो; कारण ते तुम्हाला गोष्टी सांगत; घरगुती औषध पाणी सुचवीत, अडचणीत सल्लामसलत देत; कोठे नडले तर अंगमेहनत ही करीत, लहान थोरात मिळून मिसळून वागत, त्यामुळे आपण त्यांना 'भले' म्हणतो.

'हो, निर्मला बाई म्हणाल्या, 'भाऊ म्हणजे आम्हा बायकांना वाड्यात मोठाच आधार होता. खुशाल त्यांच्या जीवावर घरी मुले बाळे ठेवून आम्ही बाहेर जाऊन येत होतो. नाहीतर त्या भावीण बाई! बरे झाले! बिऱ्हाड गेले! सदानकदा उसने! बाई आगपेटी सुध्दा उसनी मागायची पहाटे रात्री बेराती खुशाल उठवायची झोपेतून आगपेटीसाठी!

'असे मागे कुणी आपल्याला वाईट म्हणणार नाही असेच नेहमी आपण प्रयत्न पूर्वक वागत जावे.' नाना म्हणाले.

# श्रीसाईउदीचा चमत्कार

## श्री. पी. एस्. भुजबळ

श्रीसद्‌गुरु श्रीसाईबाबांनी आपल्या ह्यातीत शिरडी येथे द्वारकामाईत जी धुनी पेटत ठेवली ती आजतागायत इतर भक्तांनी व संस्थान कचेरीने तशीच पेटत ठेवली आहे. श्रीसाईबाबा लौकिक दृष्ट्या जरी ह्या जगातून गेले असले तरी त्यांचा पवित्र व तेजस्वी आत्मा त्या धूनीतील प्रखर ज्वालांप्रमाणे तेवत आहे ही माझ्या नेहमीच्या अनुभवाची गोष्ट आहे. श्रीसाईबाबा आपल्या ह्यातीत कांही दिवस रोगी लोकांना औषधे देत पण पुढे पुढे त्यांनी औषध देणे बंद केले. आपल्या हातानी धुनीतील उदी देवून असंख्य रोगी ह्या संकटग्रस्त लोकांना मुक्त व बरे केले आहे हाच मोठा चमत्कार आहे. ह्या लौकिक जगात प्रत्येक वस्तूची व सजीव प्राण्यांची शेवटी उदी होते. त्या दृष्टीने पहाता उदीला ह्या जगात फार महत्त्व आहे. माझ्या श्रीसाईबाबांचे उदीने असंख्य रोगी व संकटग्रस्त लोक मुक्त झाले आहेत ही अत्यंत सत्य गोष्ट आहे. या संबंधीचा माझ्या घरी श्रीसाईबाबांचे स्थानावर आलेला एक अनुभव श्रीसाईभक्तांचे माहिती साठी देत आहे. माझ्या श्रीसाईबाबांचे ठाण्या-वरून दर गुरुवारी संध्यांकाळी ६॥ ते १० वाजे पर्यंत जी उदी संकट व रोगग्रस्त लोकांना दिली जाते तो खास शिर्डीतील द्वारका माईतून आणलेली असते. त्यात इतर कसलीही भेसळ नसते. अशी भेसळ कधीच करावयाची नाही असा माझा ठाम निश्चय आहे. श्रीसाईबाबांचीच उदी श्रीबाबांचे पवित्र चरणास लावून त्यांचे नाव घेवून लोकांना देणे व धीर देणे एवढेच माझे काम असते. ते मी श्री साईबाबांवर संपूर्ण भरवसा ठेवून पार पाडतो. बाबांच्या उदी संबंधात मी आपणापुढे एक अनुभव सादर करीत आहे.

तो असा :— माझे एक मित्र डॉक्टर आहेत. त्यांचा श्रीसाईबाबांवर व माझ्या सांगण्यावर फार विश्वास ! नुसता विश्वास नाही तर त्यांना त्याची प्रचीती ही आली आहे. प्रचीती आल्याशिवाय कोणताही सुबुद्ध माणूस कोणावरही विश्वास ठेवत नाही. एकदा एके दिवशी दुपारी त्यांचा १५ वर्षांचा मुलगा शाळेचे मैदानावर खेळत असतांना एकाएकी त्याला दुपारी १ वाजता झटका आला. त्याचा डावा हात निर्जीव झाला व सारखा हालू लागला. कोणत्याही वेदना झाल्याची जाणीव त्या हाताला होत नव्हती. हातातून पूर्णपणे वारा गेल्या सारखा निर्जीव झाला घरांतले सर्व लोग घाबरून गेले. डॉक्टर असल्यामुळे घरात जेवढे म्हणून उपचार करणे शक्य होते तेवढे सर्व केले. पण गुण काही येईना व आराम पडेना. काय करावे ह्या विवंचनेत असतांना त्यांना माझी व श्रीसाईबाबांची आठवण झाली. पण मी

ऑफिसमध्ये असल्यामुळे मी अवेळी सापडणे शक्य नव्हते. म्हणून ते माझी वाट पहात बसले. संध्याकाळी ६ वाजता मुलांस गाडीत घालून घरी आणले. मला सर्व घटना सांगितली मी लगेच त्याला श्रीसाईबाबांचे गादी जवळ घेऊन गेलो. त्यांचे कडे त्याला पहाण्यास सांगितले. मी श्री बाबांची शिर्डीची उदी पाण्यांत टाकली श्रीबाबांचे चरणास लावली व श्रीबाबांचे नांवाचा जप करून उदबत्ती लावून उदी मिश्रित तीर्थ तयार केले. त्याचे सर्व अंगावर शिंपडले. उदी सर्व अंगास लावली व तीर्थ पिण्यास दिले. श्रीबाबांचा आशीर्वादाचा मोर पिसारा त्याच्या अंगावरून व हातावरून फिरवून श्रीबाबांचे नावाचा सारखा जप व घोष ठेवला आणि १० मिनिटात त्याचे हातात जीव आल्या सारखे वाटले. हाताला जाणीव होऊ लागली हात हालण्याचे थांबले. मुलगा शांत व आनंदी दिसू लागला. पण त्याच्या मनगटा-पासून पुढील हाताची बोटे यात काही फरक पडला नाहीं म्हणून त्यास त्याचा हात श्रीबाबांचे मंदिराचे उंबऱ्यावर ठेवण्यास सांगितला व माझी श्रीसाईबाबांचे आरतीची ६-३० वेळ झाली म्हणून आरतीस सुरवात केली. आरती २० मिनिटे चालली तेवढयांत संपूर्ण हात व बोटे अगदी उत्तम पूर्वस्थितीत झाली. नंतर मग तो आनंदाने उदी खावून समाधान पावला.

थोडयाच वेळात मी खोबरेल तेलात श्रीबाबांची उदी घालून व मंत्रून ते तयार केलेले तेल त्याचे हातास चोळले व घरीही चोळण्यास दिले. त्यामुळे त्याचा हात आता पूर्वीसारखा झाला आहे. सात शनिवारी संध्याकाळी ७ वा. श्रीबाबांचे मंतरलेले तांदूळ घेवून दहीभात करून त्याचे अंगावरून उतरून पिंपळाचे झाडाखाली ठेवण्यास सांगितले. त्यामुळे सर्व पिशाच्च बाधा संपूर्णपणे कायमची बंद झाली. हात पूर्वी प्रमाणे बरा झाला. पण हृयावेळी कोणताही औषधोपचार केला नाही. फक्त शक्ति वर्धक टॉनिके तेवढी दिली असाहा साई उदी तीर्थाचा प्रभाव आहे. असे पुष्कळ अनुभव आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे श्रीबाबांचे उदीवर श्रद्धा व सबूरी ठेवली तर वाटेल त्या संकटातून श्रीबाबा पार पाडतात. असा माझा ठाम विश्वास आहे.

—*—*—

# गोंदवलेकर महाराज

## व्यक्तिदर्शन

पु. मु. अत्रे

**अहो आपल्या घरी आज लग्न आहे ना ?**

भाऊसाहेब केतकरांचे चिरंजीव तात्या यांचा विवाह सांगलीच्या गोखल्यांच्या मुलीशी महाराजांच्या संमतीनेच जमला. लग्न गोंदवल्यासच व्हावयाचे ठरले.

त्याप्रमाणे मुहूर्ताच्या दिवशी सकाळ पासून विधी व सोहळे सुरू झाले. इकडे श्री महाराज सकाळीच जे खोलींत झोपले ते वराला मूळ घेऊन येण्याची वेळ झाली तरी उठले नाहीत आणि ते असल्याशिवाय लग्न लागणार नाही व त्यांना कोणी उठविणार ही नाही असें भाऊसाहेबांनी वधूपक्षाला स्वच्छ सांगून टाकले.

गोखले मंडळीना हे महाराज काहीं औरच वाटले. पण मुलीचे वडील ! करतात काय? सर्वजण श्रीमहाराजांच्या उठण्याची वाट बघत बसले. दहा अकरा वर्षांची बिचारी मुलगी सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत गौरीहर पूजीत तेथेच झोपी गेली. अंधार पडून दिवे लागल्यावर श्रीमहाराज उठून त्यांनी खोलीचे दार उघडले व बाहेर येऊन भाऊसाहेबांना म्हणाले. "अहो, आपल्या घरी आज लग्न आहे ना ? मग मला तुम्ही उठवले कसे नाही ? बरे आतां तरी झटपट आटपा !" बताशाला साज चढवला. नवरदेव घोड्यावर आरूढ झाले आणि स्वत: श्रीमहाराजांनी त्याला धरून श्रीवधूमंडपाकडे मिरवणूक निघाली. मध्यरात्र सरल्यावर सर्व विधी पूर्ण होऊन मंगलाक्षता पडल्या आणि वधू-वरांनी एकमेकांना हार घातले. गोखल्यांच्या वऱ्हाडी मंडळीत एक उत्तम ज्योतिषी होते. त्यांनी शेवटचे 'सावधान' होताक्षणीच वेळ टिपून घेतली व त्यावेळेची कुंडली मांडली. त्यात असे निघाले की ती अमृत वेळा होती आणि त्यावेळी गुरु-चंद्र-शुक्र बलवान असून इतर ग्रहांची अशुभ दृष्टी नव्हती. अर्थात लग्नासाठी तोच मुहूर्त योग्य होता, श्रीमहाराजांनी कुठलाही गवगवा न करता तो नेमका साधला होता ! याला म्हणावे विकास ज्ञानी ! !

**दानात फार मोठी शक्ति आहे.**

गोंदवल्यास हजारों लोक दर्शनाला येत. कोणी रामापुढे काहीं ठेवीत. कोणी श्री महाराजांपुढें तर कोणी आईसाहेबांना अर्पण करीत. श्रीमहाराज आपल्या व देवापुढच्या वस्तू देवून टाकीत; पण आई साहेबांजवळ ५--६ वर्षांत दोन ट्रंका भरून मौल्यवान जिनसा साठलेल्या श्रीमहाराजांनी पाहिल्या होत्या. श्रीमहाराजांनी एक दोन वेळा सांगूनही आईसाहेब कोणाला कांही देत नव्हत्या. एकदा त्याना सपाटून ताप आला. आणि श्वास घ्यायला येईना, इतका खोकला झाला. अवस्था कठीण वाटल्यामुळे त्यांना महाराज हलकेच म्हणाले, "हे बघ, आता तुझा भरवसा दिसत नाही. तेव्हां तुझ्या जवळ असलेल्याचे दान करून टाक." महाराजांनी ब्राह्मणाकडून संकल्प सांगवून त्यांच्या हातून उदक ही सोडविलं आणि ट्रंका उघडून त्यांतील मौल्यवान दागिने, भांडी , लुगडी, शालू, शेले, वगैरे गांवातील गरीब लोकांना स्वत: वाटून टाकले. परंतु ते गेल्यावर ५--१० मिनिटांनी आई साहेबांना जोराची उलटी होऊन त्या त्या शुध्दीवर आल्या. श्रीमहाराजांना हे कळल्यावर ते म्हणाले, दानांत फार मोठी शक्ती आहे. सर्वस्व दानाने तर मृत्यू देखील टळतो."

**नामस्मरण दुरितांचा नाश करते.**

रामनवमीच्या सप्ताहाने मंडळी थकून सायंकाळी मंदिरासमोर विश्रांती घेत असता भाऊसाहेब फारेस्ट श्रीमहाराजांना म्हणाले, "महाराज, उत्सवामध्यें प्रत्येकाला फार श्रम होतात त्याचा त्याला फायदा काय होतो ?" मंडळी हसली, पण श्रीमहाराज म्हणाले, " भाऊसाहेब, तुमचा प्रश्न योग्य आहे. देवाच्या उत्सवाचा मुख्य हेतु त्याचे अधिकाधिक स्मरण होऊन त्याच्या प्राप्तीस चालना मिळावी. नामस्मरण दुरितांचा ही नाश करते. " भाऊसाहेब म्हणाले, "असे कोणाचे तरी दुरित आपण घालवावे." श्रीमहाराज म्हणाले, "रामाच्या इच्छेने लौकरच तसे घडेल. " चार दिवसांनी निजामच्या करोडगिरीच्या नावयावरचे श्रीमंत अधिकारी भाऊसाहेब जवळगीकर श्री. महाराजांचे नाव ऐकून सहकुटुंब आले. त्यांना पंडुरोग असल्यामुळे ते कडक पथ्यावर जगत होते. पन्नासव्या वर्षापर्यंत त्याना संततीही नव्हती. त्यांच्या कुटूंबाचे नाव गंगाबाई, या फार उदार व सात्त्विक होत्या. श्रीमहाराजांनी हकीकत ऐकून त्यांना पुष्कळ दिवस रजा घेऊन रहाण्यास सांगितले, मंदिरांत पडेल ते काम करून व मिळेल ते अन्न रामाचा प्रसाद म्हणून घेऊन सर्वकाळ रामनाम घेण्यास सांगितले. त्या नवराबायकोनी दृढ विश्वासाने सेवा व जप करण्यास आरंभ केला.

भाऊसाहेबांनी सर्व पथ्य सोडून बाजरीची भाकरी व तिखट आमटी खाण्यास सुरुवात केली. दीडएक महिन्याने त्यांचा फिकेपणा आपोआप कमी झाला. आणखी कांही महिन्यानी त्यांची पत्नी प्रसूत होऊन मुलगाही झाला. पण त्याचे पाय जन्मत: वाकडे होते. ते पाहून श्रीमहाराज म्हणाले, "भाऊसाहेब, अजून दुरिताचा शेष आहे. मी जप नेमून देतो तो मनापासून करावा. राम हेही निवारील. " नेमून दिलेला जप उभयतांनी अगदी मनापासून नियमित केला आणि मुलाचे पाय हळू हळू सरळ झाले. नंतर त्यांना निरोप देतेवेळी श्रीमहाराजांनी भाऊसाहेब फॉरेस्टरांना मुद्दाम म्हटले, "पाहिलेत ना ! रामाची सत्ता ही अशी आहे. "

**रामाच्या घरचा प्रसाद बाधेल कसा ?**

कर्नाटकातील चिंतामणी भट नावाच्या दशग्रंथी ब्राह्मणाला पोटशूळाची फार जुनी व्यथा होती. अन्न व औषध पाणी हि त्यांना सोसत नसे. म्हणून ते नुसते दूध घेत. श्रीमहाराजांचे नाव ऐकून ते गोंदवल्यास दर्शनास आले. त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते व नुकतीच प्रसादाची पाने घेतली होती. श्रीमहाराज ब्राह्मणांना म्हणाले "उत्तम झाले. तुम्ही अगदी वेळेवर आलात . स्नान करून पानावर बसा. ब्राह्मणांनी काकुळतीनी आपली स्थिती श्रीमहाराजांना सांगितल्यावर ते म्हणाले., "अहो, हे माझ्या घरचे अन्न नाही. हा रामाच्या घरचा प्रसाद आहे ! रामाचा प्रसाद बाधेल ही शंका तुम्हाला येते तरी कशी ? तुम्ही पोटभर जेवा. " ब्राह्मण मनात म्हणाले, काय होईल ते होऊ दे. आज आपण पोटभर जेवावे आणि मेलोच तर साधूच्या पायाशी भरण्यांत कल्याणच आहे." म्हणून स्नान करून ते जेवावयास बसले आणि श्रीमहा-

राजांनी त्याना आग्रह कर करून जेवावयास घातले. त्यादिवसापासून त्यांचा पोट शूळ गेला तो कायमचा.

### समाधि म्हणजे तरी काय ? स्वतःला विसरणे ! :

एका सकाळी श्रीमहाराज नाथभागवतावर मंदिरामध्ये निरूपण करीत होते. गोदूबाई हिचा मुलगा दत्तू फार दंगा करीत होता व तिने सांगितले तरी ऐकत नव्हता. म्हणून श्रीमहाराजांनी त्याला आपल्याजवळ मांडी घालून डोळे मिटून बसण्यास सांगितले व क्षणभर त्याच्या डोक्यावर हात ठेवला. लगेच मुलगा स्वस्थ बसला. नंतर चांगले दोन तास निरूपण झाले, मंडळी गेली त्यालाही खूप वेळ झाला, तरी मुलगा आपला जसाचा तसाच बसलेला ! तेव्हा गोदूबाईचा जीव खालीवर होऊ लागला. ती महाराजांना म्हणाली, "महाराज, दत्तूला आणखी किती वेळ असाच बसवणार ? त्याला जागा करा ना." श्रीमहाराज म्हणाले, "हे ग काय ? तो जागा होता तेव्हा मस्ती करतो म्हणून तूच तक्रार करीत होतीस आणि आता अगदी शांत बसला आहे तर त्याची काळजी करतेस !" श्रीमहाराजांनी मुलाच्या डोक्यावर हात ठेवला व पाठीवरून खाली फिरवला की लगेच तो जागा झाला. हा काय प्रकार आहे असे एकाने विचारता श्रीमहाराज म्हणाले, "अरे, ही नुसती गंमत ! डॉक्टर औषध टोचून भूल देतात, म्हणजेच मोहनिद्रा आणतात तसेच हे आहे ! याचा प्रयोग मात्र वारंवार करू नये. हा एक समाधीचाच प्रकार समजा ना ! समाधि म्हणजे स्वतःला विसरणे ! पण नामात स्वतःला विसरणे ! ही सर्वश्रेष्ठ समाधि होय. तशी समाधि लागायला पाहिजे."

## पुन्हा काशीयात्रा (१९०५–७)

### त्रिवेणी संगमावर वेणीदान

१९०५ साली श्रीमहाराज पुन्हा काशीला जाण्यास निघाले. या वेळेस फार थोडी मंडळी घ्यायची व अयोध्येपर्यंत लवकर जाऊन गोंदवल्यास चटकन परत यायचे असे ठरले. गेल्या यात्रेला १०० च्या वर मंडळी होती; या वेळेस यादी करूनही 'थोड्या लोकांची यादी' २०० पेक्षा जास्त झाली ! गेल्या वेळेला श्रीमहाराज ६ महिन्यांनी परत आले होते; या वेळेस अडीच वर्षांनी ते 'चटकन्' घरी आले ! सौ. आईसाहेबांना बरोबर घेतले होते. श्रीरामरायाचे दर्शन व त्याचा प्रेमळ निरोप घेतल्यावर त्यांनी आपली कफनी रामासमोर सर्वांना झाडून दाखविली. तीत काहीही नव्हते. प्रयागला गंगेजवळच्या धर्मशाळेत यात्रा उतरली व धार्मिक विधि झाले,. तो श्रावण-मास होता. वेणीदाना-करिता २० जोडपी श्रीमहाराजांबरोबर नावेतून त्रिवेणी संगमावर निघाली. इतर मंडळी तीरावर होती. सुमारे ५० यार्ड नाव सुखरूप गेल्यावर तिच्या तळाला भोक पडले व जोराने पाणी आत शिरू लागले. नावाड्यांनी शिकस्त करूनही पाणी हटेना तेव्हां श्री-महाराज शांतपणे हसून म्हणाले, "आज गंगामाई आपणावर प्रसन्न झाली आहे. आपणा सर्वांना ती पोटात घेऊन पावन करणार !" तेव्हा नाव बुडण्याची खात्री वाटल्यामुळे

एकच गोंधळ उडाला. श्रीमहाराजांबरोबर आपण आज जगाचा निरोप घेणार म्हणून काहीजण स्वतःला धन्य समजून स्वस्थ होते, तर थोड्यांना काहीही झाले तरी श्रीमहाराज सर्वांना सांभाळतीलच याची खात्री असल्यामुळे ते निर्भयपणे बसले होते. पण काही जोडप्यांनी मात्र श्रीमहाराजांचे पाय घट्ट धरून आक्रोश करण्यास सुरुवात केली. एवढ्या अवकाशात नाव निम्मी बुडून धारेला लागली. तेवढ्यात श्रीमहाराजांनी नावाड्यांच्या मदतीने नाव धारेत आडवी केल्यामुळे तिची गती कमी झाली. नंतर त्यांनी आपली कफनी काढून तिचा बोळा भोकावर पायाने दाबून धरला आणि भजनाच्या पवित्र्यात अगदी सहजतेने बाहू वर करून टाळ्या पिटीत 'जयजय श्रीराम' चा घोष चालविला. सगळ्यांनी साथ केली. इकडे नाव अर्धी बुडालेली पाहून किल्ल्यावरून संकटाच्या तोफा सुटल्या व संरक्षण-मदतीच्या मोठमोठ्या सरकारी नावा पाण्यावर सरसरत क्षणात या नावेच्या अगदी जवळ येऊन ठेपल्या. श्रीमहाराजांनी एक पाय त्या नावेत व दुसरा कफनीवर दाबून धरलेला अशा स्थितीत सर्वांना हाताचा आधार देऊन सरकारी नावेत घेतले व बोळ्या-वरचा पाय काढून तेही त्या नावेत आले. तोच फुटक्या नावेने गंगेत ठाव दिला. हे पाहतांच तीरावर जमलेल्या नागरिकांनी टाळ्या पिटीत नामाचा गजर केला व किल्ल्यावरील गोऱ्या सैनिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात श्रीमहाराजांचे हार्दिक अभिनंदन केले. श्री-महाराज उतरता क्षणीच लोक दर्शनाला धांवत सुटले, पण त्यांनी तिकडे लक्ष न देतां नायकांना व नावाड्यांना छाती दडपेतो दम भरला. नंतर दुसऱ्या चांगल्या नावेतून वेणीदान विधी उत्तम पार पडला.

### भगवानरावाच्या उरावर समंध

धिप्पाड व धीट स्वभावाचा भाविक भवानराव श्रीमहाराजांकडे जळाऊ लाकडे फोडून रहात होता. त्याला श्रीमहाराजांनी प्रयागहून काशीला पाठवून बाबू भटजीला आपल्या येण्याबद्दल निरोप दिला. भटजीने भगवानरावाला ठेऊन घेतले व त्याला जप करण्यास एकांत मिळावा म्हणून शेजारच्या रिकाम्या वाड्यात गच्चीवर राहण्यास जागा करून दिली. त्या वाड्यांत एका संन्याशाचा समंध आहे असे भटजींनी बजावले, पण श्रीमहाराजांच्या पाठिंब्यामुळे समंध आपणाला काही एक करू शकणार नाही अशी भगवानरावाची ठाम निष्ठा होती. चार-सहा दिवसानंतर एका रात्री समईच्या उजेडात अंथरुणावर बसून तंबाखू तोंडात टाकीत असता तो संन्यासी समंध गच्चीकडून खोलीत आला, व दोघांची बाचाबाची होऊन कुस्तीवर बेतले. भवानराव थकल्यावर संन्यासी त्याच्या उरावर बसून त्याचा गळा गच्च आवळू लागला. तेव्हां भवानरावाने मोठ्या आर्ततेने 'महाराज' अशी हाक मारली. तो तात्काल जिन्यात खडावांचा आवाज झाला. व प्रत्यक्ष श्रीमहाराज त्याला दिसले. संन्यासाकडे पाहून ते जोराने ओरडले, "काय आहे रे?" श्रीमहाराजांना पाहताच तो भरकन् गच्चीकडे धावला व वरवंडीवरून त्याने गंगेत उडी ठोकली. (अपूर्ण)

# अनंतता

(न्यायरत्न विनोद यांच्या अभंगावरील चिंतन)

**पिंडीला लागला, अजाणता पाय**

**प्रायश्चित्त काय, घेऊ सांग**

**प्राप्त तू होशील, वाटले हे मला**

**सांतता विसरला, जीव माझा** (अ. सं. पृ. ३५)

गुरुदेव म्हणतात की, शिवाच्या पिंडीला अजाणता माझा पाय लागला तर मी प्रायश्चित्त काय घ्यावे ? तसेच हे अनंतते, म्हणजे हे गूढ तत्त्वा ! मी तुझ्या अगदी जवळ आलो आहे, आणि आता फक्त तुझ्याप्रत यावयाचे आहे. सदर अभंगात पिंडी हे प्रतीक शिवस्वरूपाकरिता आहे. शिवस्वरूप हेच अखिल विश्व व्यापून राहिलेले विश्वस्वरूप आहे. या शिवस्वरूपाशी संपूर्ण एकात्मता झाल्यावर मनुष्याला शिवस्वरूपाशिवाय म्हणजे परमेश्वराशिवाय रिता ठावच सापडत नाही. इतका मनुष्य परमेश्वराशी एकरूप होतो. या बाबतीत विसोबा खेचरांचे उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहेच. श्रीविठ्ठलाच्या आदेशावरून नामदेव त्यांच्या दर्शनास गेले असता विसोबा शिवपिंडीवर पाय ठेवून बसलेले आढळले. नामदेवांनी जेथे जेथे म्हणून त्यांचे पाय उचलून ठेवले तेथे तेथे पायाखाली शिवलिंग तयारच होते. पुढे अशीच गोष्ट खुद्द नामदेवांची झाली. त्यांना प्रत्येक वस्तूत फार काय, पण प्रत्यक्ष पूजाद्रव्यात सुद्धा विठ्ठल दिसू लागला. हे त्यांच्या पंजाबातील एका अभंगावरून सिद्ध आहे. तात्पर्य, अनंतता म्हणजे प्राप्त सान्त स्वरूपातून प्राप्त अनंततेप्रत म्हणजे विश्वाच्या मूल तत्त्वाप्रत जाण्यासाठी सर्व तऱ्हेचे संकल्प-विकल्प सोडून फक्त त्या मूल तत्त्वाच्याच चिंतनात दंग झाले पाहिजे, म्हणजे परमेश्वर दूर नाही.

—श्री. चिपळूणकर गुरुजी

दादर

*—*—*—*

# शिरडी-वृत्त

या महिन्यात बाहेर गावच्या भक्तांची बरीच गर्दी होती. मुंबई, मद्रास, गुजराथ या ठिणाणाहून यात्रेकरूंच्या व मुलांच्या वऱ्याच सहली येऊन गेल्या. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तने :— १) काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.
२) ह. भ. प. सीतादेवी रा. पाटील, चिखली.
३) श्री. तुकाराम बुवा परदेशी, शिर्डी.
४) ह. भ. प. नरहरी गोपाळबुवा व्यास, तळेगाव, पुणे.

भजन :— १) श्री. लक्ष्मण ना. गावडे, भजन मंडळी, जुहू, कोळीवाडा, मुंबई.
२) श्री. व्ही. रामचंद्र आणि मंडळ, पुणे.
३) श्री. के. आनंदराव मद्रासी भजन मंडळ, सागर (सागर शिमोगा)

नृत्यकला :—१) श्री. कृष्णा पार्णीकर नृत्यप्रभा पार्टी, मुंबई.

गायन वादन :—१) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई. (२) श्रीमती पी. उषा राव, सिकंदराबाद. (३) श्री. व्ही. टी. जामगांवकर, मुंबई. (४) श्री. बी. जी. रॉय, मुंबई. (५) श्री. नारायणराव इंगळे, मुंबई. (६) सौ. उषा बा. जोशी, मुंबई. (७) श्री. विनायक बा. खारकर, मुंबई. (८) श्री. मु. आ. नेने, मुंबई. (९) श्री. वसंतराव देशपांडे, पुणे. (१०) श्री. अनंत भ. पाले, पंढरपूर. (११) सौ. शकुंतला य. केसकर, कल्याण. (१२) बेबी मुमताज म्हैसगावकर, पार्टी. (१३) शोभना रंजना पार्टी. (१४) श्री. रामभाऊ हिवाळे, औरंगाबाद. (१५) कु. रजनी ब. कामत, बडोदा. (१६) श्री. गंगाधर नरहरी व्यास, पुणे. (१७) सौ. शकुंतला मो. जोशी, नासिक.

स्वराज्यदिन :—२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त मा. श्री. का. सी. पाठक कोर्ट रिसीव्हर यांचे शुभ हस्ते श्रीसाई मंदिरावरील कळसाजवळ ध्वजवंदन कार्यक्रम झाला. सर्व संस्थान कर्मचारी, मंदिर सेवेकरी, सन्माननीय पाहुणे, होमगार्ड पथक, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी—विद्यार्थिनी बँड पथकासह उपस्थित असल्याने कार्यक्रम थाटात साजरा झाला. मुलांना खाऊ वाटण्यात आला.

माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. गांवकर साहेब, लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, कर्नाटक.
२) मा. श्री. पी. सुब्रम्हण्यम् आय. ए एस जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३) मा. श्री. नायडू, ॲडिशनल सेक्रेटरी, भारत सरकार दिल्ली.
४) मा. श्री. बी. आर. शर्मा, डे. कमिशनर, ॲग्रिकल्चर डिपार्टमेंट.
५) मा. श्री. के. पद्मजा भय्या, कमिशनर, को. ऑ. डिपार्टमेंट, महाराष्ट्र राज्य.

हवापाणी :—शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | साई निकेतन,<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| २. प्रकाशनाचा कालावधी | मासिक |
| ३. मुद्रकाचे नांव | श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | निर्णयसागर प्रेस, ८५ ऑफ डीई, टोकरसी जीवराज रोड, शिवडी,<br>मुंबई ४०००१५ |
| ४. प्रकाशकाचे नाव | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | साई निकेतन<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०००१४ |
| ५. संपादकाचे नाव | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | साई निकेतन,<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री. साईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. काशिनाथ सीताराम पाठक यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**का. सी. पाठक**
(प्रकाशकाची सही)
रिसीव्हर
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

———:०:———

श्रीसाईभक्ताना अपूर्व भेट....

# श्रीसाईनाथ रोजनिशी

येत्या वर्षप्रतिपदेच्या दिवशी प्रकाशित होणार

या संग्राह्य रोजनिशीची वैशिष्टये—

※ १९७४ च्या वर्षप्रतिपदेपासून ते १९७५ च्या वर्षप्रतिपदेपर्यंतची दैनंदिन क्राऊन साईजची पाने.

※ श्रीसाईबाबांचे अल्पचरित्र.

※ श्रीसाईबाबा संस्थान शिरडीत काय काय पहाल—परम-पवित्र स्थळांचा संक्षिप्त परिचय.

※ श्रीबाबांच्या आरत्या, थोर संतांच्या जयंत्या नि पुण्यतिथी उत्सव दिनांक

※ श्रीसाईबाबांच्या भारतव्यापी मंदिराचे पत्ते.

※ समाधि मंदिर, द्वारकामाई, गुरुपादुकास्थान येथील अनेक रंगी संग्राह्य चित्र.

※ श्रीबाबांचे फ्रेम करून ठेवण्यासारखे बहुरंगी चित्र.

※ आकर्षक बांधणी, मोहक छपाई.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई, १४.**